RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**मुंबईत महाविकास आघाडीत जागा वाटपावरून खडाजंगी, काँग्रेस नाराज**

पान 2 पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे

वर्ष: ९ अंक : ४२ ■ मुंबई, मंगळवार १७ ते २३ सप्टेंबर '२४

मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

**फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती: एकनाथ खडसे**

पान 2 पाहा

## विधानसभा निवडणूक दिवाळी नंतर होणार , मुख्यमंत्र्यांनी दिले संकेत



### तीन टप्प्यांत मतदान पार पडणार

**नागपूर, दि. १६ प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांसाठीची घोषणा पुढील महिन्यात पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. तर, दिवाळीनंतरच निवडणुकांचे फटाके फुटणार आहेत. सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू असून विधानसभा मतदारसंघात उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. तसेच, आपल्याला महाविकास आघाडी किंवा महायुतीमध्ये संधी पाहून, किंवा संधी मिळणार नाही, याचा अंदाज घेऊन उमेदवारांचेही पक्षांतर सुरू आहे. दरम्यान, यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकांबाबत भाष्य केले होते. आता, पुन्हा एकदा त्यांनी अनौपचारिक गप्पांमध्ये विधानसभा निवडणुकांबाबत भाष्य केले आहे. त्यामुळे, विधानसभेच्या निवडणुका दिवाळीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होतील. सन 1999 नंतर महाराष्ट्रात पहिल्यांदाच विधानसभा निवडणुका एकापेक्षा अधिक टप्प्यात होण्याची यंदा दाट शक्यता आहे. 29 ऑगस्ट रोजी एबीपी माझाने दिलेल्या बातमीवर आता खुद्द मुख्यमंत्र्यांनीच शिक्कामोर्तब केले आहे.

सन 2024 उजाडला तेव्हापासून राज्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका केव्हा होतील ही चर्चा सुरू आहे. सुरुवातीला विधानसभा निवडणुका लोकसभेत सोबतच होतील अशी चर्चा रंगली होती. त्यानंतर विधानसभा निवडणुका सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात होईल अशी चर्चा सुरू झाली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना माहिती दिली की, राज्यात नोव्हेंबरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात दोन टप्प्यांमध्ये निवडणुका होतील. दरम्यान, राज्यात नोव्हेम्बर महिन्यात निवडणुका घेण्यासंदर्भात काही प्रशासकीय, काही राजकीय तर काही सुरक्षा विषयक कारणे आहेत.

राज्यात लोकसभा निवडणुकांमध्ये कमी मतदान झाले, त्याचे प्रमुख कारण मतदार याद्यांमधील गोंधळ होता. त्यामुळे प्रशासनाने विधानसभा निवडणुकांच्या पूर्वी मतदार याद्यांमधील चुका दुरुस्त करणे सुरु केले आहे. चुकांची दुरुस्ती, नव्या मतदारांची नोंदणी, यामुळे राज्यातील मतदार याद्या लवकर पूर्ण झाल्या नाहीत. म्हणून हरयाणाचे निवडणूक महाराष्ट्राच्या आधी होत आहे.

राज्यात गेल्या काही महिन्यात आरक्षण विषयक आंदोलन, उपोषण आणि यात्रानी वातावरण ढवळून निघाले आहे. अनेक ठिकाणी नेत्यांना गावबंदी ही झाली. त्यामुळे निवडणूक विषयक तणाव लोकसभेच्या वेळेला संपूर्ण राज्यात खास करून मराठवाड्यात दिसून आला. याशिवाय लव जिहाद सारखे मुद्दे, त्या विरोधात हिंदू संघटनांचे राज्यव्यापी आंदोलन आणि नंतर रामगिरी महाराजांचे वक्तव्य. अशा अनेक कारणांनी राज्य पोलीस दल गुप्तहेर विभाग, निवडणूक आयोग सर्वांना वाटतंय की निवडणूक पूर्ण तयारीनिशी व्हाव्या. म्हणूनच विधानसभा निवडणूक नोव्हेंबर महिन्यात एक नव्हे तर दोन टप्प्यात घेण्याची शिफारस होती.

राज्यातील सत्ताधारी महायुतीला लोकसभा निवडणुकीत धक्का बसला. त्याच्यातून सावरत तडकाफडकीने मतदारांना आकर्षित करणाऱ्या काही योजना महायुतीने जाहीर केल्या. अजूनही काही योजनांची घोषणा होणे अपेक्षित आहे. अशा स्थितीत महायुतीने जाहीर केलेल्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ मतदारांपर्यंत पोहोचवल्यानंतर निवडणुकीत जाण्याचे ठरविले.लाडकी बहीण योजनेसारख्या थेट लाभाच्या योजना त्यापैकीच एक प्रमुख कारण आहे. महायुती असो किंवा महाविकास आघाडी दोन्ही बाजूला तीन तीन पक्ष असल्याने जागावाटप आधसारखा सोपे राहिलेले नाही. त्यामुळे दोन्ही आघाड्यांनाही निवडणुका उशिरा झाल्यास आपापसातील वाद सोडवण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकतो. या सर्व कारणांमुळे दोन्ही पक्ष राजकीय भूमिका काहीही घेत असले तरी निवडणुका उशिरा होत असल्याबद्दल समाधानीच आहे.

## SpaceX: अब्जाधीश इसाकमन अंतराळ प्रवासानंतर सुखरूप पृथ्वीवर परतले



**फ्लोरिडा**

अब्जाधीश उद्योगपती आणि अंतराळवीर जेरेड इसाकमन आपल्या क्रूसह सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचा पाच दिवसांचा प्रवास रविवारी पहाटे फ्लोरिडाच्या ड्राय टॉर्टुगास किनाऱ्यावर उतरून संपला.

यासह, ते चंद्राच्या प्रवाशांनंतर सर्वाधिक उंचीवर प्रवास करणारे अंतराळवीर बनले आहे. त्यांनी पृथ्वीच्या वर सुमारे 740 किमी वर पहिला खाजगी स्पेसवॉक केला. ही उंची इंटरनॅशनल स्पेस स्टेशन आणि हबल स्पेस टेलिस्कोपपेक्षा खूप जास्त आहे. एलोन मस्कची कंपनी स्पेसएक्सच्या फाल्कन-9 रॉकेटमधून मंगळवारी या मोहिमेचे प्रक्षेपण करण्यात आले.

या मोहिमेमध्ये, जेरेड इसाकमन, पायलट किड पोटेट, मिशन स्पेशालिस्ट सारा गिलिस आणि ॲना मेनन ज्या कक्षेत गेले, तिची उंची 1,408.1 किमी होती. ५० वर्षांहून अधिक काळ कोणताही अंतराळवीर या उंचीवर गेला नाही. माजी सोव्हिएत युनियनने 1965 मध्ये पहिला स्पेसवॉक केल्यापासून इसाकमन हे असे करणारे 264 वे व्यक्ती ठरले आहेत. या यादीत SpaceX च्या साराह गिलिसचे नाव 265 व्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत सर्व स्पेसवॉक व्यावसायिक अंतराळवीरांद्वारे केले जात होते.

त्याच्या कॅप्सूलने पृथ्वीच्या वातावरणात ताशी 27 हजार किमी वेगाने प्रवेश केला. हवेतील घर्षणामुळे त्याचे तापमान 1900 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले, परंतु त्याच्या खाली असलेल्या हीटशील्डमुळे अंतराळवीर सुरक्षित राहिले. कॅप्सूल खाली उतरताच त्याचा वेग मंदावला. नंतर पॅराशूट उघडण्यात आले आणि पाण्यात उतरवण्यात आले. नंतर त्यांना बोटीच्या सहाय्याने जमिनीवर आणण्यात आले.



## राज्यातील पत्रकारांच्या मागण्यांसाठी मंगेश चिवटे मुख्यमंत्र्यांना साकडे घालणार!

**मुंबई**

महाराष्ट्रातील पत्रकारांच्या मागण्या आणि राज्याचे डिजिटल मिडिया धोरण जाहीर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी आणि मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना साकडे घालणार आहेत. डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी मंगेश चिवटे यांना मुख्यमंत्र्यांना संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाची प्रत सादर केली. पूर्वाश्रमीचे पत्रकार असलेल्या चिवटेंना पत्रकारांच्या प्रश्नांविषयी विशेष आस्था आहे. ज्येष्ठ पत्रकारांच्या शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समिती मार्फत दिल्या जाणाऱ्या सन्मान मानधन (पेन्शन) व राज्याचे डिजिटल मिडिया धोरण या संदर्भात मुख्यमंत्र्यांना साकडे घालण्याचा शब्द त्यांनी दिला.

## 'धनगर व धनगड' दोन्ही समाज एकच, जीआर काढण्यासाठी लवकरच निर्णय

**मुंबई**

धनगर व धनगड दोन्ही समाज एकच आहेत, या बाबत सरकारी जीआर काढण्यासाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळातील पाच सदस्य व राज्याचे तीन वरिष्ठ आयएएस अधिकारी यांची समिती नेमून लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली. या बाबत राज्य सरकारने जीआर काढण्याची मागणी धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने केली होती. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाच्या शिष्टमंडळा सोबत बैठक बोलावली होती. सकल धनगर समाजाच्या शिष्टमंडळाने राज्य सरकारने धनगर व धनगड हे दोन्ही एकच आहेत असा जीआर काढण्याची मागणी केली होती.

## संजय गायकवाडांच्या प्रक्षोभक विधानामुळे खळबळ



**बुलडाणा**

खासदार राहुल गांधी यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर केलेल्या वक्तव्यानंतर आता शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी मोठ वादग्रस्त विधान केले आहे. राहुल गांधी यांच्यावर वादग्रस्त विधान करत त्यांनी 11 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केले. आमदार संजय गायकवाड यांनी वादग्रस्त विधान केल्यामुळे मोठी खळबळ उडाली. आमदार संजय गायकवाड यांच्या वादग्रस्त विधानानंतर पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. आमदार संजय गायकवाड यांनी बुलडाणा येथील त्यांच्या कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली आहे.

संपूर्ण भारतामध्ये गोर गरीब गरीब जनता जगू शकत नव्हती. त्यांना जगण्याचा अधिकार नव्हता, म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये एससी, एसटी, ओबीसी, एनटी वगैरे सगळ्यांना आरक्षण दिलं. आता या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये संविधान धोक्यात आहे, महायुती संविधान बदलणार आहे, असा आरोप काँग्रेस आणि महाविकास आघाडीकडून करण्यात आला. त्यामुळे आता आरक्षण संपणार या बोंबा मारून काँग्रेसवाल्यांनी सगळ्या मागासवर्गीय समाजाच्या आणि ओबीसी समाजाची दिशाभूल केली. आता राहुल गांधी देशातील आरक्षण संपवण्याची गरज आहे, असं सांगत आहेत. त्यामुळए त्यांचा खरा चेहरा आज लोकांच्या समोर आला आहे, अशी जोरदार टीका आमदार संजय गायकवाड यांनी केली.

महात्मा गांधी यांच्या मारेकऱ्यांची वृत्ती आणि राहुल गांधींची जीभ कापण्यासाठी बक्षीस जाहीर करणाऱ्याची वृत्ती एकच आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधींना मारण्याची धमकी दिल्याने त्यांचा आवाज बंद होणार नाही. राहुल गांधींनी आजवर कायम संविधान रक्षणाची भूमिका घेतली आहे. ते जे बोललेच नाही ते त्यांच्या तोंडी घालून त्यांना बदनाम करण्याचे जे कारस्थान सुरू आहे, ते कधीही यशस्वी होणार नाही. राहुल गांधींच्या केसालाही धक्का लावण्याची हिंमत कोणात नाही. काँग्रेसचे कोट्यवधी कार्यकर्ते राहुल गांधींची ढाल आहेत. महत्वाचे म्हणजे या देशातील सामान्य जनता राहुल गांधी यांच्या सोबत खंबीरपणे उभी आहे. संजय गायकवाड या आमदाराच्या बेताल वक्तव्याचा आम्ही निषेध करतो आणि राज्यात जर कायद्याचे थोडे बहुत राज्य शिल्लक असेल तर तातडीने संजय गायकवाडच्या मुसक्या आवळून, राज्यसरकारने अशा विषवल्लीला मुळापासून उखडून फेकले पाहिजे. अशा प्रकारचं ट्विट करुन बाळासाहेब थोरात यांनी गायकवाड यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावरून संजय गायकवाड यांच्यासह महायुतीवर जोरदार हल्लाबोल केला आहे. नाना पटोले यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत संजय गायकवाड यांच्यावर निशाणा साधला आहे. शिंदेजी, वाचाळवीर संजय गायकवाडला वेळीच आवरा. ज्याला लोकप्रतिनिधी म्हणून वागायची अक्कल नाही, त्यानं राहुल गांधींवर बोलूच नये. अंथरूण बघून पाय पसरावे म्हणतात ना, तसं गायकवाडनं आधी आपली पातळी पाहावी. नाना पटोले यांनी पुढे म्हटलंय की, पहिले भाजपचा एक नेता पक्षाचा झेंडा हाती घेऊन देशाच्या विरोधीपक्ष नेत्याला जीवे मारण्याची धमकी देतो. दुसरे भाजपचा नेता आणि मंत्री राहुल गांधींचा उल्लेख दहशतवादी म्हणून करतात. यावर नरेंद्र मोदी आणि अमित शाह मूग गिळून गप्प बसतात आणि आता एकनाथ शिंदे यांच्या पक्षातला गुंड प्रवृत्तीचा आमदार देशाच्या विरोधी पक्षनेत्याची जीभ कापून टाकण्याची भाषा करतो. यावर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडलीच पाहिजे.

## गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार- उद्धव ठाकरे

**छत्रपती संभाजीनगर**

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूवीर उद्धव ठाकरे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे. या दौऱ्यावेळी त्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या महाअधिवेशनाला हजेरी लावली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर हल्लाबोल केला. तसेच गेलेली सत्ता पुन्हा येईल. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आहे, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

"मी देखील या ठिकाणी आलो आहे. मला सत्तेची पर्वा नाही. मला तुमच्या आयुष्याची चिंता आहे. मला तुमच्या कुटुंबाची पर्वा आहे. सत्ता येत असते आणि सत्ता जात असते. गेलेली सत्ता पुन्हा येणार आहे. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आणि सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र, एक लक्षात घ्या, एकजूट महत्त्वाची आहे. याआधी एकदा जुनी पेन्शन योजनेसाठी तुम्ही सर्वजण नागपूरला आला होतात. मात्र, तुमच्यापैकी एक घटक



तिकडे गेला आणि तुमच्या आंदोलनावर पाणी ओतलं. जे फोडाफोडीचं राजकारण शिवसेनेबरोबर करण्यात आलं. हे जुनी पेन्शन योजनेसाठी आंदोलन करणाऱ्यांबरोबर देखील करतील. हे सरकार गेल्यात जमा आहे. खरं तर महायुतीच्या नेत्यांना सत्तेशिवाय उपाशी ठेवलं पाहिजे, असा निर्धार करायला हवा", असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला.

"विधानसभेची निवडणूक जवळ येईपर्यंत ज्यांना आपली बहीण माहिती नव्हती. त्यांनी लाडकी बहीण योजना आणली. आता दोन महिन्यांनी निवडणुका आहेत. मी तुम्हाला वचन देतो की, दोन महिन्यांनी आपलं सरकार आलं तर मी तुमची जुनी पेन्शन योजनेची मागणी मान्य करतो. आता मी ही घोषणा केल्यानंतर महायुतीला घाम फुटेल आणि ते ही तुमची मागणी कदाचित मान्य करतील. हा दगाफटका तुम्हाला नाही तर महाराष्ट्राला होणार आहे. पण तुम्ही एक लक्षात घ्या ज्यांनी माझ्याशी गद्दारी केली त्यांना मी कुटुंबातील मानलं होतं. ते विश्वासघात करू शकतात मग हे तुमच्यावर वार करू शकणार नाहीत का? त्यामुळे मला हे सरकार नको आहे. मला मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न तेव्हाही नव्हतं आणि आताही नाही", असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला.

"मला सत्तेमधून कोणीही निवृत्त करु शकत नाही. मी सत्तेत असलो किंवा नसलो तरी जोपर्यंत जनता माझ्याबरोबर आहे. तोपर्यंत सत्ता ही आपल्याकडेच राहील. कारण जनतेची सत्ता आहे. सरकार वेगळं असलं तरी जनतेची सत्ता ही महत्वाची असते. जनता हीच माझी ताकद आणि जनता हीच माझी सत्ता आहे", असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## विरोधी पक्षातील एका नेत्याकडून मला पंतप्रधानपदाची ऑफर
### नितीन गडकरी यांचा गौप्यस्फोट

**नागपूर**

लोकसभा निवडणुकीच्या निकालाचं चित्र स्पष्ट झाल्यानंतर लगेच 'मला पंतप्रधान पदाची ऑफर होती' असा गौप्यस्फोट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. विरोधीपक्षाच्या एका नेत्यानं मला पंतप्रधान पदाची ऑफर दिली होती, असं देखील ते म्हणाले. पंतप्रधान होणं माझ्या जीवनाचं लक्ष्य कधीही नव्हतं. मी माझ्या पक्षाशी एकनिष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. नितीन गडकरींच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



लोकसभा निवडणुकीवेळी मला विरोधी पक्षातील एका नेत्याकडून पंतप्रधान पदासाठी पाठिंब्याची ऑफर आली होती. मी त्यांची ऑफर धुडकावली होती. मी त्यांना स्पष्टपणे सांगितलं की, तुम्ही मला पाठिंबा का द्याल आणि मी तुमचा पाठिंबा का बरं घेऊ असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केलं आहे. नितीन गडकरी यांनी नागपुरात एका कार्यक्रमात बोलताना खळबळजनक दावा केला आहे. तसंच मी माझ्या तत्त्वाशी तडजोड करत नसल्याचं ते म्हणाले. नितीन गडकरी यांनी पंतप्रधानपदाची ऑफर नाकारल्याचं स्पष्ट केलं असलं तरी यामुळं राष्ट्रीय स्तरावर आणि महाराष्ट्रातही पुन्हा एकदा गडकरींच्या नावाची चर्चा सुरु होऊ शकते.

याच कार्यक्रमादरम्यान बोलताना नितीन गडकरी म्हणाले, 'एक भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते मला भेटण्यासाठी आले होते. चर्चा सुरु असताना मी त्यांना सहज म्हणालो नागपूर आणि विदर्भात ए.बी. वर्धन मोठे नेते होते. त्यावर ते म्हणाले, ए.बी. वर्धन तर संघाचे विरोधी होते?' त्यावर मी म्हणालो, 'प्रामाणिकपणे विरोध करणाऱ्यांचाही सन्मान करायला हवा. ज्याच्या विरोधात बेइमानी आहे, त्यांचा सन्मान कोण करेल' असा प्रश्न मी त्यांना केला असं नितीन गडकरी म्हणाले आहेत.

## केजरीवाल दोन दिवसांत राजीनामा देणार

**नवी दिल्ली**

दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने १३ सप्टेंबर रोजी जामीन मंजूर केला. ते गेल्या १७७ दिवसांपासून तुरुंगात होते. २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केली होती. त्यानंतर २६ जून रोजी त्यांना दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयने अटक केली होती. न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर ते तुरुंगामधून बाहेर आले. दरम्यान, तुरुंगामधून बाहेर आल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी आज (१५ सप्टेंबर ) आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना मोठी घोषणा केली आहे. पुढील दोन दिवसांत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे, असं अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या घोषणेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.





"काही लोक म्हणत आहेत की सर्वोच्च न्यायालयाने जामीन देताना काही अटी घातल्या आहेत, त्यामुळे मी काहीच काम करु शकणार नाही. मागच्या काही वर्षभरात केंद्र सरकारने काय कमी अटी घातल्या होत्या का? केंद्र सरकारने एक कायदा, दोन कायदे फक्त कायदे आणून आमची पॉवर कमी करण्याचा प्रयत्न केला", असा आरोप अरविंद केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर केला. पुढे बोलताना ते म्हणाले, "पुढील दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर मी (अरविंद केजरीवाल) आणि मनिष सिसोदिया आम्ही दोघेही दिल्लीच्या लोकांमध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधणार आहोत. त्यानंतर जनतेला आम्ही प्रामाणिक वाटत असलो तर आम्हाला ते निवडून देतील", असं केजरीवाल यांनी म्हटलं आहे.

"आता दोन दिवसांत आम आदमी पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक होईल. त्या बैठकीमध्ये माझ्या ऐवजी आम आदमी पक्षामधील दुसऱ्या नेत्याची मुख्यमंत्रिपदी निवड करण्यात येईल. आता दिल्लीच्या जनतेचा निर्णय जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत मी मुख्यमंत्रिपद स्वीकारणार नाही. आता थेट दिल्लीच्या नागरिकांनी मला पुन्हा निवडून दिल्यानंतर मी आणि मनिष सिसोदिया आम्ही जबाबदारी स्वीकारणार आहोत. जनतेला मी प्रामाणिक वाटत असेल तरच जनतेने निवडून द्यावं आणि जर मी प्रामाणिक नसेल तर जनतेने निवडून देऊ नये", असंही मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे. दरम्यान, केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यानंतर आम आदमी पार्टी कोणला मुख्यमंत्री करणार असा प्रश्न सर्वांना पडला आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदासाठी आप नेते गोपाल राय, आतिशी मार्लेना, सौरभ भरद्वाज, कैलाश गहलोत, इम्रान हुसैन आणि अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांच्या नावांची चर्चा होत आहे. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत हे सहा नेते असतील.

## ते त्यांच्या पत्नीला मुख्यमंत्री बनवण्यासंदर्भात निर्णय घेणार- सिरसा

**नवी दिल्ली**



दिल्ली सरकारच्या मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी तिहार तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे नुकतेच जामिनावर बाहेर आले आहेत. १३ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला आणि त्याच दिवशी संध्याकाळी ते तुरुंगातून बाहेर आले. तुरुंगातून बाहेर पडल्यावर केजरीवाल हे वेगवेगळ्या सभा व कार्यक्रमांमधून केंद्रातील मोदी सरकारवर टीका करत आहेत. अशातच आज त्यांनी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी मोठी घोषणा केली. "पुढील दोन दिवसांत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे", असं अरविंद केजरीवाल म्हणाले. केजरीवाल यांच्या या घोषणेनंतर यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. दरम्यान, भाजपानेही यावर भाष्य केलं आहे.

भाजपा नेते मनजिंदर सिंग सिरसा केजरीवालांच्या राजीनाम्याच्या घोषणेवर प्रतिक्रिया देताना म्हणाले, "केजरीवाल यांनी राजीनामा देण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागितली आहे. या दोन दिवसांत ते त्यांच्या पत्नीला मुख्यमंत्री बनवण्यासंदर्भात निर्णय घेणार आहे. यासाठी ते दोन दिवसांत पक्षातील सर्व आमदारांचं मन वळवणार".

सिरसा म्हणाले, "अरविंद केजरीवाल स्वतःहून राजीनामा देत नाहीयेत. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडलं आहे. न्यायालयाने त्यांना मुख्यमंत्रिपदावरून खडे बोल सुनावल्यानंतर त्यांच्याकडे दुसरा पर्यायच उरलेला नाही. केजरीवाल भ्रष्टाचारात इतके बुडालेत की सर्वोच्च

मराठी अक्रॉस मुंबई

# सिमेंटच्या रस्त्यांवर आयआयटी लक्ष ठेवणार



मुंबई

मुंबईतील रस्ते खड्डे आणि खराब झाल्याच्या तक्रारी बीएमसीकडे वारंवार येतात. ही समस्या सोडवण्यासाठी बीएमसीने एक मार्ग शोधला आहे. मुंबईतील 701 किमी लांबीचे रस्ते सिमेंट करण्यासाठी बीएमसीने वर्क ऑर्डर जारी केली आहे. पहिल्या टप्प्यात 392 किलोमीटर लांबीचे रस्ते सिमेंटीकरण केले जाणार असून दुसऱ्या टप्प्यात 309 किलोमीटर लांबीचे रस्ते सिमेंटीकरण करण्यात येणार आहेत. यामध्ये मुंबई शहर, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरातील रस्त्यांचा समावेश आहे. हे काम 1 ऑक्टोबर 2024 पासून सुरू होणार आहे. या रस्त्यांच्या बांधकामाच्या वेळी आयआयटी मुंबईकडून थर्ड पार्टी ऑडिट केले जाईल, त्यासाठी बीएमसी आणि आयआयटीमध्ये करार करण्यात आला आहे.

बीएमसीचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले की, रस्त्यांचा दर्जा चांगला राहावा यासाठी विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या जातील. यामध्ये क्यूब टेस्ट, कोअर टेस्ट, स्लंप कोन टेस्ट, ड्युरेबिलिटी टेस्ट, फील्ड डेन्सिटी टेस्ट आदींद्वारे गुणवत्ता तपासली जाणार आहे. IIT च्या ऑडिटमुळे अनावधानाने झालेल्या चुका टाळण्यास आणि काम जलदगतीने पूर्ण होण्यास मदत होईल. या निर्णयामुळे रस्त्यांच्या कामात गुणवत्ता येणार असून, कोणत्याही ठेकेदाराचा निष्काळजीपणा असेल तर थर्ड पार्टी ऑडिटनंतर सत्य बाहेर येईल, असे बांगर म्हणाले.

त्यामुळेच मुंबईतील रस्त्यांच्या सिमेंटीकरणाचे काम आयआयटीच्या देखरेखीखाली करून घेण्याचा निर्णय बीएमसीने घेतला आहे. रस्त्यांचा दर्जा, कोणते साहित्य वापरावे आदींबाबत आयआयटी मते आणि सूचना देणार असल्याचे त्यांनी सांगितले. रस्ता बांधकाम पूर्ण करणे काम पूर्ण होईपर्यंत त्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी आयआयटीची असेल. रस्त्यांच्या देखभाल आणि पुनर्बांधणीसाठी सल्ला देणे, कमतरता आढळल्यास तपासणी करणे, गुणवत्ता तपासण्यासाठी चाचण्या घेणे, तांत्रिक लेखापरीक्षण अहवाल तयार करणे इत्यादी कामे IIT करेल.

## 4 वर्षांत 110 गर्भवती महिला एचआयव्ही पॉझिटिव्ह




मुंबई

सीएसएमटीच्या कामा रुग्णालयात गेल्या 4 वर्षात गर्भवती महिलांच्या चाचणीत 110 महिला एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळल्या आहेत. गरोदर महिलांची वेळेवर तपासणी झाली नाही तर त्यांना याची जाणीवही होत नाही. मात्र, गेल्या ३ वर्षांत सकारात्मकतेचे प्रमाण कमी झाले आहे. असुरक्षित संभोग, संक्रमित रक्त संक्रमण, संक्रमित सुया इत्यादींद्वारे एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत, तुमची स्थिती तपासण्यात आणि जाणून घेण्यात काहीही नुकसान नाही. नियमानुसार, प्रत्येक गर्भवती महिलेने एचआयव्ही चाचणी करणे आवश्यक आहे. ही चाचणी सर्व सरकारी आणि मनपा रुग्णालयांमध्ये मोफत आहे. कामा येथे, महिलांसाठी विशेष रुग्णालय, 2020 कोविड कालावधीत 5,493 महिलांची चाचणी घेण्यात आली, त्यापैकी 15 पॉझिटिव्ह आढळल्या. त्यानंतर 2021 मध्ये 6,686 महिलांची तपासणी करण्यात आली आणि 37 महिला पॉझिटिव्ह आढळल्या. तर 2022 मध्ये 8,496 पैकी 40 महिला पॉझिटिव्ह आढळल्या होत्या, परंतु 2023 मध्ये 3,480 महिलांची तपासणी करण्यात आली आणि 18 महिला एचआयव्ही बाधित आढळल्या.

## लैंगिक अत्याचाराच्या आरोपीची शिक्षा उच्च न्यायालयाकडून कायम

मुंबई

पाच मुलींचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या एका व्यक्तीची जन्मठेपेची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. ठाण्याच्या विशेष पोक्सो न्यायालयाने मार्च 2014 मध्ये 40 वर्षीय तरुणाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात त्या व्यक्तीने उच्च न्यायालयात अपील केले होते.



न्यायमूर्ती रेवती मोहिते धरणे आणि न्यायमूर्ती पी.के. चव्हाण यांच्या खंडपीठाने अल्पवयीन मुलींचे वय 8 ते 13 वर्षे असल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यांची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे अपीलकर्त्यावरील आरोपांना पुष्टी देतात. मुलींची साक्ष विश्वासार्ह वाटते. अपीलकर्त्याचा गुन्हा गंभीर आहे. विशेष न्यायालयाच्या आदेशात कोणतीही त्रुटी नाही. अशा प्रकारे, खंडपीठाने दोषी व्यक्तीचे अपील फेटाळून लावले आणि शिक्षा कायम ठेवली.

फिर्यादीनुसार, अपीलकर्त्याला परिसरातील एका व्यक्तीने एका मुलीचे लैंगिक शोषण करताना पाहिले होते. ज्याची माहिती पीडितेच्या आईला देण्यात आली. जेव्हा इतर शेजाऱ्यांना या घटनेची माहिती मिळाली, तेव्हा एकामागून एक चारही उर्वरित पीडितांनी त्यांच्या पालकांना अपीलकर्त्याची कृती आणि परीक्षा कथन केली. त्यानंतर पोलिसांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली. पीडिता अपीलकर्त्याला काका म्हणायची. असे असतानाही अपीलकर्त्याने मुलींना घरी बोलावून शिवीगाळ केली. अपीलकर्ता पीडितेला भांडी साफ करण्याच्या किंवा विडी-माचच्या काड्या वगैरे विकत घेण्याच्या बहाण्याने बोलावत असे. त्याच वेळी, अपीलकर्त्याने आपल्या बचावात दावा केला होता की आपल्याला खोट्या प्रकरणात गोवण्यात आले आहे. पीडितांपैकी एकाच्या कुटुंबीयांशी जमिनीसंबंधीचा वाद प्रलंबित होता. त्यामुळेच त्याला या प्रकरणात चुकीच्या पद्धतीने गोवण्यात आले आहे. मात्र याला असहमती दर्शवत खंडपीठाने अपीलकर्त्याला दिलासा देण्यास नकार दिला.

## अन्नाचा दर्जा सुधारण्यासाठी आयआरसीटीसीतर्फे क्लस्टर किचन



मुंबई

मेल एक्स्प्रेस गाड्यांमधील जेवणाच्या दर्जाबाबत तक्रारी आल्यानंतर लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांमध्ये बदल करण्यात येत आहेत. भारतीय रेल्वेच्या बेस किचनची जागा आता क्लस्टर किचनने घेतली आहे, या प्रक्रियेला सुरुवात करणाऱ्या मुंबई शहरांपैकी एक आहे. ही प्रणाली संपूर्ण देशात लागू केली जाईल. या क्लस्टर किचनने महिनाभरापासून ट्रेनमध्ये खाद्यपदार्थांची पाकिटे पुरवण्यास सुरुवात केली आहे.

इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (IRCTC) ने या क्लस्टर किचनची स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, जे व्यावसायिक केटरर्सद्वारे चालवले जातील. ही स्वयंपाकघरे रेल्वेच्या जागेवर नसतील आणि पश्चिम विभागातील महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये 200 क्लस्टर किचन उभारण्याची योजना आहे. मुंबईतील हे क्लस्टर किचन पवई, कुर्ला, पनवेल, ठाणे आणि चेंबूरमध्ये बांधले जात आहे. यापैकी कुर्ला येथील स्वयंपाकघर आधीच कार्यरत आहे आणि 4000 जेवण तयार करण्याची क्षमता आहे. हे जेवण रेफ्रिजरेटेड स्टोरेज व्हॅनद्वारे पॅन्ट्री कारमध्ये वितरित केले जाईल.

IRCTC म्हणते की क्लस्टर किचनमुळे कामकाजात लवचिकता येईल आणि बेस किचनवरील अवलंबित्व कमी होईल. यासह, खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारी आता दरमहा 70-80 पर्यंत खाली आल्या आहेत आणि IRCTC लवकरच त्या शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे.

# मुंबईत महाविकास आघाडीत जागा वाटपावरून खडाजंगी, काँग्रेस नाराज




मुंबई, दि. १३ प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात विरोधी महाविकास आघाडीत जागावाटपावरून पेच निर्माण झाला आहे. मुंबईतील ३६ विधानसभा जागांपैकी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला २१ जागांवर निवडणूक लढवायची आहे. त्यासाठी उद्धव ठाकरे गटानेही तयारी सुरू केली आहे. याशिवाय शरद पवार सातपेक्षा जास्त जागांची मागणी करत आहेत. या संदर्भात काँग्रेसला केवळ ८ जागा मिळतील. त्यामुळेच येथे जागावाटपाबाबत मोठा गदारोळ होणार आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने मुंबईतील ३६ पैकी २१ विधानसभा जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. तर शरद पवारांना सात जागा हव्या आहेत. अशा स्थितीत काँग्रेससाठी केवळ आठ जागा शिल्लक राहिल्याने पक्षात नाराजी आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांनी मुंबईतील अंधेरी पश्चिम, वर्सोवा, कुर्ला, अणुशक्ती नगर, दहिसर, घाटकोपर पूर्व आणि घाटकोपर पश्चिम या जागांची मागणी केली आहे.

महाराष्ट्रात या वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्वच पक्ष आपापली रणनीती आखण्यात व्यस्त आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये जागावाटप आणि मुख्यमंत्री चेहरा याबाबत अंतर्गत मतभेद असू शकतात, मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत आघाडीचे नेते सरकार स्थापनेचा दावा करताना दिसत आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी गुरुवारी सांगितले होते की, आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मविआ २८८ पैकी १८० पेक्षा जास्त जागा जिंकेल. ते पुढे म्हणाले की, "महाविकास आघाडी मध्ये १२५ जागांवर एकमत झाले आहे आणि उर्वरित जागांसाठी बोलणी सुरू आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, उद्धव ठाकरे यांचा पक्ष शिवसेना आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी मध्ये समाविष्ट असलेल्या पक्षांनी चांगली कामगिरी केली होती. राज्यातील एकूण ४८ लोकसभा जागांपैकी मविआ ने ३० जागा जिंकल्या होत्या. त्याचवेळी या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आघाडीला नुकसान सहन करावे लागले. महाआघाडीत सामील असलेल्या पक्षांनी एकूण १७ जागा जिंकल्या होत्या. त्याच वेळी, एक जागा अपक्ष उमेदवाराच्या खात्यात गेली, ज्याने नंतर काँग्रेसला पाठिंबा दिला.

# राहुल गांधींविरोधात राज्यभर भाजपाचे आंदोलन

मुंबई

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षणाबद्दल केलेल्या वक्तव्याविरोधात भाजपकडून राज्यभर आंदोलन करण्यात आले. अकोल्यात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं आहे. अकोल्यातील शिवणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याखाली राहुल गांधी यांच्या विरोधात निदर्शने, आंदोलन करण्यात आले.

नांदेडमध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. आरक्षण विरोधात बोलणे हे काँग्रेसची भविष्यातील रणनीती आहे. देशात एक बोलायचं आणि विदेशात एक बोलायचं हे दोन मुखोटे समोर आले आहे, असं म्हणत अशोक चव्हाण यांनी राहुल गांधीवर निशाणा साधला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये महाराष्ट्राचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी कार्यकर्त्यांसह निदर्शने करत राहुल गांधींच्या विरोधात घोषणाबाजी केली. मुंबईतील आंदोलनादरम्यान भाजप आमदार मनीषा चौधरी यांनी दावा केला की काँग्रेस दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल





नेहरूपासून राहुल गांधींपर्यंत आरक्षणाला विरोध करत आहे. ते म्हणाले की, गांधींची "आरक्षण विरोधी" भूमिका समोर आली आहे. निषेध भडकावल्याबद्दल भाजपवर निशाणा साधत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी पक्षावर खोट्या बातम्या पसरवल्याचा आणि नौटंकी केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, राहुल गांधी यांनी आरक्षण संपुष्टात येईल असे कधीही म्हटलेले नाही.

राहुल गांधी यांना आता भान राहिलेले नाही प्रत्येक वेळी परदेशात गेले की, इतके विचित्र ते बोलत असतात, भारतात राहून भारताबाहेर जाऊन भारताचे नाव कमी करण्याचे काम राहुल गांधी हे वारंवार करत आहेत. परवा त्यांनी थेट आरक्षणाची गरज काय? हे वक्तव्य करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला आव्हान दिलेले आहे, देव त्यांना सद्बुद्धी देवो असं म्हणत गिरीश महाजन यांनी टीका केली आहे.

दरम्यान, कॉंग्रेसचे खासदार राहुल गांधी यानी अमेरिकेच्या दौऱ्यावर एका मुलाखतीत काँग्रेस सत्तेवर आल्यावर भारतातील आरक्षण व संविधान संपवणार या केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज धुळयात भाजपाच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. काँग्रेस हटाव.. देश बचाव.. महाविकास आघाडी हटाव.. महाराष्ट्र बचाव.. राहूल गांधी मुर्दाबात अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला.

## शिवाजी नगरमध्ये पोलीस हवालदारावर प्राणघातक हल्ला

मुंबई

४३ वर्षीय पोलिस हवालदार अफजल युसूफ पिंजारी यांनी शिवाजी पोलिस ठाण्यात तीन जणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. ड्रग्ज बाळगल्याच्या संशयावरून संशयित अल्लाउद्दीन कुरेशी याची झडती घेत असताना त्याचे दोन भाऊ शहाबुद्दीन कुरेशी आणि निजामुद्दीन कुरेशी तेथे पोहोचले आणि त्यांनी कॉन्स्टेबलला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली, असा आरोप कॉन्स्टेबलने केला आहे. यावेळी त्यांनी हवालदाराला बेदम मारहाण केली. कॉन्स्टेबलने नवभारत टाईम्सला सांगितले की, आपण संशयिताला पकडले असून पोलीस ठाण्यात माहिती देत आहोत. त्याचवेळी संशयिताचे कुटुंबीय संतप्त झाले आणि त्यांनी भांडण सुरू केले. कॉन्स्टेबलच्या म्हणण्यानुसार त्याच्या घरातील महिलांनीही हस्तक्षेप केला. स्थानिक लोकांनीही संशयिताला मदत केल्याने संशयित व त्याचा भाऊ घटनास्थळावरून पळून गेला. स्थानिक लोकांनी कॉन्स्टेबलला घेराव घातला होता, त्यामुळे त्याला वरिष्ठांना कळवावे लागले आणि अतिरिक्त पोलीस दल बोलावावे लागले. त्यानंतर तो तेथून बाहेर पडण्यात यशस्वी झाला.

## फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती: एकनाथ खडसे

मुंबई

देवेंद्र फडणवीसांनी मला राज्यपालपदाची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केला आहे. फडणवीसांनी मनापासून प्रयत्न करेन असे सांगितले होते. फडणवीसांनी मुलीची शपथ घेऊन आश्वासन दिले होते, असे देखील एकनाथ खडसे म्हणाले. दिल्लीतल्या अतिज्येष्ठ नेत्यांनी मला फोन केल्याने भाजप प्रवेशाचा निर्णय घेतल्याचें देखील एकनाथ खडसेंनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात सांगितले आहे.



एकनाथ खडसे म्हणाले, मला एक दिवशी देवेंद्र फडणवीसांनी बोलवले. तुम्ही म्हणता ना पंकजाला न्याय झाला तसाच न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यावेळी आम्ही दोघेच होते. देवेंद्र फडणवीस मला म्हणाले, नाथाभाऊ तुमची मी राज्यपालपदासाठी शिफारस करतो. त्यावर मी म्हणालो, देवेंद्रजी खरं सांगा, तुम्ही मला अनेकदा सांगितलं की हे करणार, ते देणार ते काही झाले नाही त्यामुळे माझा विश्वास बसत नाही. मी म्हटलो राज्यपाल केले तर आनंदाची गोष्ट आहे, पण माझा विश्वास बसत नाही. ते म्हणाले, माझ्या एकुलत्या एक मुलीची शपथ घेऊन सांगतो हा देवेंद्र फडणवीसचा शब्द आहे. पुढे काय झाले मला माहीत नाही पण देवेंद्र फडणवीसांनी मला आश्वासन दिली होते. साधारण ही गोष्ट 2019 सालातील आहे.

## मुंबईचे डबेवाले आणि चर्मकारांना मिळणार 25 लाखांत 500 चौरस फुटांचे घर

मुंबई

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सध्या लोकप्रिय घोषणा आणि निर्णयांचा धडाका लावला आहे. यामध्ये शुक्रवारी आणखी एका निर्णयाची भर पडली. त्यानुसार आता मुंबईच्या डबेवाल्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान आवास योजनेतंर्गत म्हाडाकडून मुंबईत डबेवाल्यांसाठी घरे बांधली जाणार आहेत. चर्मकार समाजालाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेतंर्गत मुंबईचे डबेवाले आणि चर्मकार समाजाला मुंबईत 500 चौरस फुटांचे घर अवघ्या 25 लाख रुपयांमध्ये मिळणार आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी सभागृहात याबाबतची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर डबेवाल्यांच्या संघटनेने शुक्रवारी सकाळी सह्याद्री अतिथीगृहावर देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत मुंबईतील डबेवाल्यांना मुंबईतच घर देण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून डबेवाल्यांना मुंबईत घर मिळावे, यासाठी पाठपुरावा सुरु होता. अखेर या प्रयत्नांना यश आले आहे. सह्याद्री अतिथीगृहावरील आजच्या बैठकीला नमन बिल्डरचे जयेश शाह, प्रियांका होम्स रियालिटीचे रुद्रप्रताप त्रिपाठी, आ. श्रीकांत भारतीय, डबेवाला संघटनेचे उल्हास मुके, चर्मकार निवारा असोसिएशनचे अशोक गायकवाड महाराज यावेळी उपस्थित होते.

## कारच्या भीषण अपघातात दोघेजण जागीच ठार

नाशिक

नगर - मनमाड राज्य मार्गावर हुंडाई कारचा विचित्र अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोन जण ठार झाले असून एक जण गंभीर जखमी आहे. येवला तालुक्यातील आंबेवाडी येथे आज पहाटेच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, नगर - मनमाड राज्य मार्गावर येवला तालुक्यातील आंबेवाडी येथे आज पहाटेच्या सुमारास हुंडाई कारला अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिली. यामुळे हुंडाई कार सुमारे 30 ते 40 फूट लांब रस्त्याच्या कडेला फेकली गेली. या अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे

या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी आहे. अपघातग्रस्त गाडीचा पत्रा कापून गंभीर जखमी व मृतदेह बाहेर काढण्यात आले. आकाश रमेश पवार, निलेश दगु शेवाळे असे अपघातात मृत झालेल्यांची नावे आहेत. तर शुभम गंगाधर पानमळे हा चालक गंभीर जखमी झाला आहे. मित्राला मनमाड रेल्वे स्थानकावर सोडण्यासाठी जात असताना अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमीला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल

## सौर कृषिपंपांतून शेतकऱ्यांना वीज विक्रीचे उत्पन्न मिळवून देणार - उपमुख्यमंत्री फडणवीस

मुंबई

कृषिपंपाच्या वीज कनेक्शनसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'मुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे प्रतिपादन मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या वेबसाईटचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झाले, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे व पोस्टरचे प्रकाशनही त्यांनी केले. यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव श्रीकर परदेशी आणि एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सौर कृषिपंपाच्या पॅनेल्समधून निर्माण होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये पाठवून वीज कंपन्यांना विकता येईल व त्यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल, अशी योजना लागू करण्यात येईल. त्यामुळे शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल.

ते म्हणाले की, राज्यात २०१४ पूर्वी शेतकऱ्यांना पेड पेंडिंगची समस्या तीव्रतेने जाणवत होती. त्यानंतर आपल्या सरकारमध्ये शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यावर भर देण्यात आला. आता मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडीसह तत्काळ पंप मिळत आहेत. सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होत आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होत असल्याने तेवढा काळ वीजबिल येणार नाही. साडेसात एचपी पंपाचा विचार केला तर २५ वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्याचे वीजबिलाचे दहा लाख रुपये वाचणार आहेत. ही योजना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुसुम बी योजनेच्या आधारे लागू केली असून आपण मा. पंतप्रधानांचे आभार मानतो.




त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १२ हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे करार झाले आहेत. आगामी दोन वर्षात त्यातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी शंभर टक्के सौर ऊर्जा मिळेल. शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक हरित ऊर्जा मिळण्यासोबत अनुदान आणि क्रॉस सबसिडीचे पैसे वाचतील.

गेल्या अडीच वर्षातील कार्यकाळ हा राज्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी टर्निंग पॉईंट ठरला आहे. या काळात तीनही वीज कंपन्यांनी मोलाची कामगिरी केली आहे, असे ते म्हणाले. मा. उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काही लाभार्थी शेतकऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. लाभार्थी शेतकरी या योजनेबद्दल समाधानी असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, मा. उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात गेल्या दोन वर्षात शेतकऱ्यांसाठी नवीकरणीय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे. एके काळी राज्यात साडे आठ लाख शेतकरी वीज कनेक्शनच्या प्रतीक्षेत होते पण आता पेड पेंडिंगची संख्या नगण्य झाली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे पेड पेंडिंगची समस्या इतिहास बनेल. या योजनेत आगामी तीन वर्षात राज्यात दहा लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. योजना सुरू झाल्यानंतर अल्पावधीत दोन लाख शेतकऱ्यांची निवड झाली असून त्यापैकी ४५ हजार शेतकऱ्यांच्या शेतात मागील सहा महिन्यात सौर कृषिपंप बसविले आहेत, हा एक विक्रम आहे.महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी आभार प्रदर्शन केले.

# लॉरेन्स बिश्नोईची चौकशी होणार

## ■ केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मिळाला ग्रीन सिग्नल
## ■ साबरमती कारागृहातून मुंबईत आणणार

**मुंबई**

वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये भरदिवसा झालेल्या गोळीबारप्रकरणी गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई लवकरच मुंबई पोलिसांच्या ताब्यात जाणार आहे. लॉरेन्स गुजरातच्या साबरमती तुरुंगात जवळपास वर्षभरापासून बंद आहे. सलमानच्या निवासस्थानी झालेल्या गोळीबारासह इतर प्रकरणांमध्ये मुंबई पोलीस लॉरेन्सची चौकशी करणार आहेत. सूत्रांनी उघड केले की केंद्रीय गृह मंत्रालयाच्या (एमएचए) आदेशानुसार, सीआरपीसीच्या कलम 268 अंतर्गत बिश्नोई यांना साबरमती कारागृहातून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरित करण्यावर एक वर्षाची बंदी घालण्यात आली होती. ही बंदी 30 ऑगस्ट रोजी संपली, त्यानंतर मुंबई पोलिसांनी त्याला ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या पोलीस. कठोर परिश्रमाने सलमान प्रकरणाचे गूढ उकलणाऱ्या लॉरेन्सला आणण्यासाठी अधिकाऱ्यांना गुजरातला पाठवले जाणार आहे. या अधिकाऱ्यांमध्ये दया नायक यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. नुकतेच मुंबई पोलिसांचे सहा सदस्यीय पथक दिल्लीला गेल्याचे सूत्रांनी सांगितले. ज्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि गृह मंत्रालयाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि बिश्नोईशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे सुपूर्द केली. लॉरेन्स, अनमोल आणि त्यांच्या टोळीशी संबंधित शूटर्सवर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत पोलिस आणि मंत्रालयातील अधिकारी यांच्यात दीर्घ चर्चा झाली. तसेच पुढील रणनीती ठरविण्यात आली. लॉरेन्सला साबरमती कारागृहातून मुंबईत आणण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सूत्रांकडून समजते. गणपतीनंतर मुंबई पोलीस लॉरेन्सला मुंबईत आणू शकतात. यासाठी सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये अनेक बैठका झाल्या आहेत. सलमानच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणात ६ आरोपींना अटक करण्यात आली होती, त्यापैकी एकाने पोलीस कोठडीत आत्महत्या केली होती. 5 आरोपी अजूनही तुरुंगात आहेत. लॉरेन्स विश्नोई हा पोलिसांच्या यादीत फरार आरोपी आहे.

# 14 डिसेंबरपर्यंत करा मोफत आधार अपडेट

**नवी दिल्ली**




आधारकार्ड वापरकर्त्यांना मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. मोफत आधार अपडेट करण्याची अंतिम मुदत वाढवण्यात आली आहे. आधार कार्ड मोफत अपडेट करण्याची अंतिम मुदत आज 14 सप्टेंबर रोजी म्हणजे आजच संपत होती. परंतू, UIDAI ने आता ही मुदत 14 डिसेंबर 2024 पर्यंत वाढवली आहे. मात्र प्राधिकरणाने ती तीन महिन्यांसाठी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

UIDAI च्या अधिकृत वेबसाइट https://uidai.gov.in/ वर लॉग इन करा. होमपेजवरील My Aadhaar पोर्टलवर जा आणि नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर मिळालेला OTP वापरून लॉग इन करा. यानंतर, तुमचे तपशील तपासा आणि तपशील बरोबर असल्यास, योग्य बॉक्सवर खूण करा. लोकसंख्याशास्त्रीय माहिती चुकीची आढळल्यास, ड्रॉप-डाउन मेनूमधून ओळख दस्तऐवज निवडा. दस्तऐवज अपलोड करा. दस्तऐवज JPEG, PNG आणि PDF स्वरूपात अपलोड करा.

# आता मुंबईत उभा राहणार मराठी जिमखाना

**मुंबई**

दक्षिण मुंबईत अनेक भाषिक जिमखाने अस्तित्वात असताना महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत मराठी माणसासाठी जिमखाना नसल्याची खंत अनेक वर्ष जाणवत असतानाच आता ही उणीवही लवकरच दूर करण्याची ठाम भूमिका राज्याचे शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी घेतली. शुक्रवारी त्यांनी मंत्रालयात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत दक्षिण मुंबईतच फक्त मराठी माणसांसाठीच मराठी जिमखाना उभारण्याची जाहीर घोषणाच केली.त्यासाठी चर्नी रोड, मरीन ड्राईव्ह सह छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस(व्ही.टी.) या परिसरातच जागेचा शोध सुरु असून येथेच मराठी जिमखाना शक्यतो आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच तो उभारण्या संदर्भात प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी यावेळी ठामपणे सांगितले.

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईतील चर्नी रोड येथे विविध भाषिकांसाठी जिमखाने उभारण्यात आले आहेत.मात्र जो या मुंबईचा मुळ भूमिपुत्र आहे त्या मराठी माणसासाठी एखादा स्वतंत्र जिमखाना नसण्याची उणीव सतत जाणवायची. यासाठीच दक्षिण मुंबईतच मराठी जिमखाना उभारण्यात येणार असल्याची माहिती देतानाच याच भागात मराठी माणूस असावा या प्रामाणिक उद्देशानेच येथेच ती स्वतंत्र वास्तू उभारण्यात येईल, अशीही ग्वाहीही केसरकर यांनी दिली.

सध्या चर्नी रोड येथे पारसी जिमखाना, तरं मरीन ड्राईव्ह येथे इस्लाम जिमखाना पोलीस जिमखाना,हिंदू जिमखाना, ख्रिश्चन समाजाचा जिमखाना उभे आहेत. इतकेच काय ज्या समाजाचे अस्तित्वच मूळात नगण्य आहे त्या झोराष्ट्रियन समाजाचाही जिमखाना याच मरीन ड्राईव्ह परिसरात दिमाखात उभा आहे.मात्र ज्या मराठी माणसाने मोठा लढा देवून मुंबई या संयुक्त महाराष्ट्रात राखली त्यांच्यासाठीही याच भागात एखादा जिमखाना असावा असे आपण या मुंबई शहराचे पालकमंत्री झाल्यापासून सतत वाटत होते.अखेर ही बाब आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली.त्यांनीही आपल्या कल्पनेला होकार दिल्याने याच परिसरात जागाही शोधण्यास सुरुवात केली व लवकरच दक्षिण मुंबईत मराठी जिमखाना अस्तित्वात येण्याची शक्यता निर्माण झाली.त्यामुळे आता मराठी जिमखान्यासाठी सरकारकडून लवकरच जागा देण्यात येणार असल्याचेही केसरकर यांनी ठामपणे स्पष्ट केले.

**लवकरच मराठी भाषा भवन उभे राहणार...**

मराठी भाषा भवनासाठी तत्कालीन सरकारने अतिशय कमी जागा मरीन लाईन्स येथे दिली खरी. मात्र ती उभारण्या संदर्भात त्या सरकारने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले. गेल्या अडीच वर्षाच्या राजवटीत एक विटही ठेवता आली नाही. मात्र दोन वर्षापूर्वी सत्ता परिवर्तन झाल्यानंतर मुख्यमंत्री बनलेल्या एकनाथ शिंदे यांनी याबाबत तातडीने पावले उचलली व मराठी भाषा भवन उभारण्यासाठी कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून,आचारसंहिता लागण्यापूर्वी मराठी भाषा भवनाचे भूमिपूजनही करण्यात येणार असल्याची माहितीही केसरकर यांनी दिली.

# आता एमएमआरडीएच्या घरांचे वाटप लॉटरीद्वारे होणार

**मुंबई**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) प्रकल्पग्रस्त कुटुंबांना ऑनलाइन पद्धतीने घरे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत प्रकल्पग्रस्त कुटुंबांना सर्वसामान्य पद्धतीने घरे वाटप करण्यात येत होती. यापूर्वीही घरवाटप प्रक्रियेत भेदभावाचे आरोप झाले आहेत.

त्यामुळेच एमएमआरडीएने वाटप प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यासाठी एमएमआरडीएने ॲप विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. ॲप तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या ॲपमध्ये एमएमआरडीएच्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांची संपूर्ण माहिती असेल. ॲपद्वारे उपलब्ध, घरे कोणाला आणि कधी वाटली गेली याचा संपूर्ण तपशील एका क्लिकवर उपलब्ध होईल. एमएमआरडीएकडून मुंबईसह एमएमआर परिसरात 13 मेट्रो मार्ग तयार केले जात आहेत. याशिवाय एमएमआरडीए अनेक पूल आणि रस्ते बांधत आहे. त्याचबरोबर एमएमआरडीएचे हजारो कोटी रुपयांचे अन्य प्रकल्पही येत्या काही महिन्यांत सुरू होणार आहेत.

# 5.113 कोटी रुपयांचे सोने आणि चांदी जप्त सीमाशुल्क विभागाची कारवाई

**मुंबई**

सीमाशुल्क विभागाने तीन वेगवेगळ्या प्रकरणात तस्करीचे 7.465 किलो सोने जप्त केले आहे. त्याची किंमत अंदाजे 5.113 कोटी रुपये आहे. याप्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली असून त्यात मादागास्करच्या नागरिकाचाही समावेश आहे. तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी आणि शनिवारी ही कारवाई करण्यात आली.

**तीन कारवाया, कोट्यवधींचा माल जप्त:**

एअर इंटेलिजेंस युनिटने बँकॉकहून मुंबईमार्गे दिल्लीला जाणारा जहीर अहमद या ज्वेलर्सची झडती घेतली असता, 132.68 किलो चांदीचे दागिने सापडले. दुसऱ्या एका कारवाईत 1.06 कोटी रुपये किमतीचे 1.5 किलोचे दागिने रिपब्लिक ऑफ मादागास्कर येथील महिलेकडून सापडले. तिसऱ्या प्रकरणात गुजरातमधील रहिवासी असलेल्या बाबूलाल निलेस याला मॉरिशसमधून आल्यानंतर अटक करण्यात आली.

# 16 लाखांचे सोने चोरणाऱ्याला अटक

**मुंबई**

आझाद मैदान पोलिसांनी शिवडी परिसरातून एका आरोपीला अटक केली आहे. आरोपींनी 2 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 वाजण्याच्या सुमारास एका ज्वेलर्सच्या बॅगेतून 230 ग्रॅम सोने चोरले होते. सीएसएमटीसमोरील फूटपाथवरून पायी जात असताना ही घटना घडल्याचे ज्युलर यांनी सांगितले. चोरीला गेलेल्या सोन्याची किंमत सुमारे 16 लाख रुपये आहे. ज्वेलर्सने आझाद मैदान पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाचा तपास करत असलेले लीलाधर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी सीसीटीव्ही नसले तरी घटनास्थळाची पाहणी करण्यात आली आहे. आरोपी चोर अब्बास मुस्तफा लब्बे (28) हा रे रोडवरील घरातून बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला पकडले असता हा प्रकार उघडकीस आला.

# ज्येष्ठ पत्रकार विजय वैद्य यांचे निधन

**मुंबई**

ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष, एकता विनायक संस्थेचे उपनगरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मागाठाणे मित्र मंडळ, प्रबोधनकार ठाकरे ग्रंथालय अशा विविध संस्थांचे संस्थापक, आधारस्तंभ श्री विजय दत्तात्रय वैद्य यांचे आज सकाळी त्यांचे ज्येष्ठ सुपूत्र श्री. वैभव यांच्या बोरीवली पूर्व येथील ॲम्ब्रोसिया या निवासस्थानी दुःखद निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी वैशाली, सुपूत्र वैभव, विक्रांत, सुना प्रतिमा आणि अनघा, नातवंडे हर्षल आणि गौरी असा परिवार आहे. काल दिवसभर उपनगरचा राजा गणेशोत्सव मंडळाची आमंत्रणे वाटण्याचे काम करीत होते. आज सकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला पण त्यांची तिथेच प्राणज्योत मालवली. दुपारी



दोन वाजता त्यांची अंत्ययात्रा एका सजवलेल्या रथातून ॲम्ब्रोसिया येथून निघाली. विजय वैद्य यांची कर्मभूमी असलेल्या जय महाराष्ट्र नगर येथील त्यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. तेथे अंतीम इच्छेनुसार आजच्या सर्व वर्तमानपत्रे त्यांच्या पार्थिवा जवळ ठेवण्यात आली. बँड पथकाने भक्तीगीते वाजवून त्यांना मानवंदना दिली. हा स्वर्गरथ जय महाराष्ट्र नगर येथून बोरीवली पूर्व येथील दौलतनगर स्मशानभूमी येथे नेण्यात आला. सर्व वैदिक विधी पूर्ण करण्यात आले. ज्येष्ठ चिरंजीव वैभव याने पार्थिवाला शोकाकुल वातावरणात अग्नी दिला. ॲम्ब्रोसिया, जय महाराष्ट्र नगर आणि दौलतनगर स्मशानभूमी येथे सर्व स्तरातील लोकांनी उपस्थित राहून साश्रुनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे पदाधिकारी, वृत्तवाहिन्या, वर्तमानपत्रे यांचे प्रतिनिधी, विविध राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, रिक्षाचालक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, घरेलू कामगार असे सामान्य नागरिक सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. विजय वैद्य यांना मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पा. सामक जीवनगौरव पुरस्कार तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव, आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला होता. अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते. उपनगर साहित्य संमेलन सुद्धा त्यांनी भरविले होते.

# नायर रुग्णालयात विद्यार्थिनीचा लैंगिक छळ, प्राध्यापक निलंबित

**मुंबई**

मुंबईतील नायर रुग्णालयातील एका विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याच्या आरोपाखाली असलेल्या सहयोगी प्राध्यापकाला निलंबित करण्यात आले आहे. प्राथमिक तपासात समोर आलेले तथ्य लक्षात घेऊन बीएमसी प्रशासनाने प्राध्यापकावर ही कारवाई केली आहे. पुढील तपासासाठी हे प्रकरण सावित्रीबाई फुले महिला संसाधन केंद्राच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या तक्रार निवारण समितीकडे पाठवण्यात आले आहे. बीएमसी प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, तपासानंतर येणाऱ्या अहवालावर पुढील कारवाई अवलंबून असेल. ही समिती कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाशी संबंधित सर्व बाबींची पारदर्शक पद्धतीने चौकशी करेल.

विशेष म्हणजे मेडिकल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने प्राध्यापकावर लैंगिक छळाचा आरोप केला होता. यानंतर या आरोपांच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्यात आली होती. दरम्यान, समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख म्हणाले की, या प्रकरणात सहयोगी प्राध्यापकाचे निलंबन पुरेसे नाही. या प्रकरणाची निःपक्षपातीपणे आयएएस अधिकाऱ्याकडून चौकशी झाली पाहिजे. याप्रकरणी रुग्णालयाच्या डीनला निलंबित करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.



# 21 सप्टेंबर रोजी जुहू बीच येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम

**मुंबई**

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी २१ सप्टेंबर रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे राज्य सरकार, स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सांगितले.

दलामल हाऊस, नरीमन पॉईंट येथे आयोजित आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस निमित्ताने समुद्रकिनारा स्वच्छता मोहीमेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. दराडे म्हणाले, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत सर्व १३ किनारी राज्यांमध्ये २१ सप्टेंबर, २०२४ रोजी (आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस) समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता जुहू बीच, मुंबई येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली असून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार या मान्यवरांच्या उपस्थितीत समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या सर्व यंत्रणा, स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने ही मोहीम यशस्वी करण्यासाठी समन्वायाने कामे करावे, अशा सूचना श्री. दराडे यांनी दिल्या.

यावेळी विविध यंत्रणांचे आणि स्थानिक प्रशासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# उत्सवांच्या काळात मिठाई व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ रोखण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे राज्यांना सतर्कतेचे आदेश

**मुंबई**

उत्सव काळादरम्यान मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी लक्षात घेता, यात भेसळ होण्याच्या घटना वाढण्याची शक्यता असते. यामुळे ग्राहकांचे आरोग्य लक्षात घेता, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणा (FSSAI) ने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्तांना उत्पादन आणि विक्रीवर कठोर नजर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणच्या निर्देशानुसार, उत्सवांच्या काळात मिठाई, फरसाण, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने जसे की तूप, खोवा आणि पनिर यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या वाढलेल्या मागणीमुळे काही वेळा काही उत्पादक या वस्तूंमध्ये भेसळ करतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एफएसएसएआय ने विशेष देखरेख आणि अंमलबजावणी मोहिमा राबविण्याचे निर्देश दिले आहेत.



**विशेष देखरेख आणि उपाययोजना**

प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिठाई, फरसाण आणि दुग्धजन्य उत्पादने यांची निर्मिती आणि विक्रीवर काटेकोर देखरेख ठेवावी, असे एफएसएसएआय चे निर्देश आहेत. नियमित अंमलबजावणी मोहीमा राबवून संभाव्य भेसळ रोखण्याचे निर्देश दिले आहेत.यासोबतच, ज्या बाजारपेठांमध्ये भेसळीच्या घटना घडण्याची शक्यता आहे, तिथे फूड सेफ्टी ऑन व्हिल्स (FSW) युनिट्स तैनात करावेत, असे प्राधिकरणाचे निर्देश आहेत. या युनिट्समुळे अन्न सुरक्षा नियमांचे पालन होईल आणि ग्राहकांना सुरक्षित अन्न मिळू शकेल.

# येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील पूर्वतयारींचा

## जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी घेतला आढावा

**मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यामध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारींचा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयोजित बैठकीत आज (दिनांक १३ सप्टेंबर २०२४) आढावा घेतला. तसेच निवडणुकीच्या कामकाजात कोणतीही कसूर राहू नये, यासाठी योग्य ती काळजी घेऊन सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने, सहकार्याने कार्य करावे. कोणत्याही लहानात लहान अडचणीलाही गांभीर्याने घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देशही गगराणी यांनी या बैठकीत संबंधित यंत्रणांना दिले.



अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी ( मुंबई शहर), संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर, सह पोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदान केंद्रांची स्थिती, आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदार याद्यांची स्थिती आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करणे, मतदान संयंत्र ठेवण्यासाठी स्ट्राँग रुम, संवेदनशील मतदान केंद्रांची यादी, पोलिस आणि निवडणूक यंत्रणा यांच्याकडून विविध मतदारसंघांमध्ये संयुक्त पाहणी आदींबाबत अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (उपनगरे) राजेंद्र क्षीरसागर आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांनी आढावा सादर केला.

संपूर्ण स्थिती जाणून घेत प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी म्हणाले की, विधानसभा निवडणुकीशी संबंधीत मुंबईतील सर्वच यंत्रणांकडून उत्तम पद्धतीने काम सुरू आहे. मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत महत्वाचे असल्याने प्रत्येक नागरिकांपर्यंत आपली यंत्रणा पोहोचेल, हे सुनिश्चित करावे. मतदार यादीमध्ये मतदारांची नाव नोंदणी करणे इत्यादी प्रक्रियाही लवकरात लवकर पूर्ण करावी. नागरिकांना त्यांच्या निवासाच्या ठिकाणापासून अगदी जवळ मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभ रचनेवर भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने देखील गृहनिर्माण संस्थांशी पुन्हा एकदा भेटी देऊन समन्वय साधावा. संपूर्ण कामकाजादरम्यान कोणत्याही प्रकारची लहानात लहान अडचण असेल तरी ती आपल्याकडे न ठेवता त्यावर वेळीच आणि योग्य पद्धतीने तोडगा निघावा, यासाठी वरिष्ठांशी वेळोवेळी चर्चा करावी. निवडणुकीसंदर्भातील संपूर्ण तयारी अत्यंत चोखपणे आणि जबाबदारीने पार पाडावी, असे निर्देशही गगराणी यांनी यावेळी दिले.

# उत्तर प्रदेशातील वडिलोपार्जित जमिनीसाठी मुंबईत रक्तरंजित संघर्ष

## सहा जणांविरुद्ध एफआयआर

**मुंबई**

मुंबईतील सुमारे 30% लोक यूपीमधील आहेत. अशा स्थितीत अनेकवेळा यूपीमधील वाद मुंबईतही मिटतात, या वेळी तेथील वाद येथे वाढतात. अशीच एक घटना भांडुप पोलिस ठाण्यात पोहोचली, जिथे टॅक्सी चालक इरफान खान, मूळचा यूपीमधील सुलतानपूर जिल्ह्यातील असून, त्याने त्याच्या 6 भाऊ आणि पुतण्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेने फिर्यादीत सांगितले की, तो भांडुप येथे त्याच्या एका मोठ्या आणि दोन लहान भावांसह राहतो. समोर त्याचा सावत्र भाऊ व त्याला चार मुलेही राहत आहेत. सुलतानपूर येथील वडिलोपार्जित जमिनीवरून दोघांमध्ये वाद सुरू आहे. इरफानने पोलिसांना सांगितले की, 10 सप्टेंबर रोजी त्याचा दुसरा लहान भाऊ तालिब गावातून मुंबईत आला. 12 सप्टेंबर रोजी तो भांडुपच्या सोनापूर येथील कमाल बेकरीजवळ उभा असताना त्याचा सावत्र भाऊ इब्रार खान आणि समोर राहणारा पुतण्या मेहबूब खान यांनी तालिबला घेरले.

या दोघांनी तालिबवर गावातील वडिलांसोबत गैरवर्तन आणि गैरवर्तन केल्याचा आरोप केला. वाद वाढत गेला आणि दोन्ही आरोपींनी तालिबला मारहाण सुरू केली. दरम्यान, इब्रार इतर तीन मुले आणि एक नातेवाईकही तेथे आले. तसंच तालिबचा भाऊ मोहम्मद खान आणि मुर्तझा खानही मध्यस्थी करण्यासाठी तिथे पोहोचले.

पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, इब्रारचा मुलगा मुजफ्फरने इरफानवर पॉवर ब्लॉकने हल्ला केला. तसेच इब्रारने इरफानचा भाऊ मुर्तझा याच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार केले. मुर्तझाला जखमी अवस्थेत मुलुंडच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर इरफानने सावत्र भाऊ इब्रार खान आणि त्याच्या चार मुलांविरुद्ध भांडुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# संपादकीय

## धक्कादायक निर्णय

अनपेक्षित निर्णय घेण्यासाठी ओळखले जाणारे दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दोन दिवसांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगून पुन्हा एकदा आश्चर्य व्यक्त केले. दिल्लीचा पुढचा मुख्यमंत्री कोण होणार हे त्यांनी ज्या प्रकारे स्पष्ट केले नाही, त्यावरून पुढील दोन दिवस अटकळांचा टप्पा सुरू राहणार असून, त्यामुळे देशभरात केजरीवाल आणि दिल्लीची चर्चा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. केजरीवाल यांना चर्चेच्या केंद्रस्थानी राहायचे आहे हे स्पष्ट आहे. सामान्य जनतेसमोर खटला उभा करायचा आहे असे सांगून त्यांनी राजीनामा दिला, पण त्यांच्या राजीनाम्यामागची मूळ कारणे काही औरच होती हे समजू शकते. त्याचे पहिले कारण असे दिसते की सर्वोच्च न्यायालयाने अबकारी धोरण घोटाळ्यात त्यांना जामीन मंजूर केला, पण अनेक कडक अटी घातल्या. या अटींमुळे त्यांना मुख्यमंत्री म्हणून काम करणे अशक्य झाले आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यांना केवळ मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात जाण्यापासून रोखले नाही तर उपराज्यपालांच्या परवानगीशिवाय कोणत्याही सरकारी फाइलवर स्वाक्षरी करण्यासही त्यांना रोखले. एवढेच नाही तर अबकारी धोरण घोटाळ्यावर काहीही बोलू शकत नाही, अशी अटही घातली. केजरीवाल यांच्याकडे राजीनामा देण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता हे आश्चर्यकारक नाही, परंतु जर त्यांना राजकीय शुद्धता आणि नैतिकतेची चिंता असती, तर अबकारी धोरण घोटाळ्यात त्यांना अटक होऊन तुरुंगात पाठवले गेले तेव्हाच त्यांनी राजीनामा द्यायला हवा होता. आश्चर्य म्हणजे तुरुंगातूनच त्यांनी सरकार चालवण्याचा आग्रह धरला. यावेळी ते आणि त्यांचे सहकारी नवीन उत्पादन शुल्क धोरण आणून कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे सांगत असतील, पण या धोरणात अनियमितता नव्हती तर ती मागे का घेतली, या प्रश्नाचे उत्तर कोणाकडे नाही. या घोटाळ्यात अरविंद केजरीवाल यांच्यासह अनेकांना जामीन मिळाला आहे हे खरे आहे, पण जामीन हा क्लीन चिटचा समानार्थी शब्द असू शकत नाही. केजरीवाल आपल्यावर चुकीच्या पद्धतीने गोवण्यात आल्याचे सांगत असले आणि जनतेकडून प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र घेऊन ते मुख्यमंत्रीपदी विराजमान होतील, असे सांगत असले तरी अबकारी घोटाळ्याचे सत्य की खोटे याचा निर्णय देशातील न्यायालयांनीच घ्यायचा आहे. जनतेसाठी. केजरीवाल यांच्या राजीनाम्याचे एक कारण असे दिसते की, त्यांना हरियाणा आणि त्यानंतर आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत जनतेची सहानुभूती मिळवायची आहे. दिल्लीच्या निवडणुका तीन महिने आधी नोव्हेंबरमध्ये घेण्याची मागणीही त्यांनी केली आहे. सहानुभूतीचा फायदा मिळवण्यात ते यशस्वी होतात की नाही हे येणारा काळच सांगेल, पण आजवरच्या त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी अनेकवेळा स्वत:च्या शब्दांची अवहेलना करून ज्या पद्धतीने निर्णय घेतले, त्याचा परिणाम त्यांच्यावर झाला आहे, हे नाकारता येणार नाही प्रतिमा पूर्वीसारखी राहिली नाही.

## काँग्रेस व आप

अखेर हरियाणात काँग्रेस आणि आप यांचे जमले नाही. जमले नाही म्हणण्यापेक्षा यापुढे जमणार नाही, असाच एकूण रागरंग आहे. आतापर्यंत गेल्या दहा वर्षात काँग्रेस ज्या ज्या राज्यात सत्तेवर होती. त्या त्या राज्यात आम आदमी पक्षाने आपले बस्तान बसवले. पहिला प्रदेश म्हणजे दिल्ली, अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणारे अरविंद केजरीवाल होते. त्याला अण्णा हजारे यांचा घोर विरोध होता. पण त्या काळात अनेक बडे बडे नेते सोबत घेऊन केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली. तेव्हा त्यांच्याबरोबर प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, कवी कुमार विश्वास आणि इतर अनेक बडे बडे नेते होते. प्रशांत भूषण यांनी तर कोट्यवधी रुपयांची देणगी दिली होती. अशा या आम आदमी पक्षाला तत्कालीन काँग्रेस शासित राज्यात आपले बस्तान बसू शकते, हे समजून चुकले होते. काँग्रेसची यथेच्छ बदनामी करून त्याचा लाभ आपल्याला मिळू शकतो. असे अरविंद केजरीवाल यांना वाटले नसते तरच नवल. केजरीवाल यांच्या मनमोहक घोषणांनी सर्वात आधी दिल्लीकरांना आकर्षित केले. पहिल्यांदा त्यांना दिल्लीत बऱ्यापैकी जागा मिळाल्या तरी पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. तेव्हा भाजपला विरोध हा समान धागा पकडून आप आणि काँग्रेसने संयुक्त सरकार बनवले. पण ते फार काळ टिकले नाही. त्यानंतर पुन्हा निवडणूक झाली आणि त्यात आम आदमी पक्षाने जवळजवळ 90 टक्के जागा जिंकून दिल्ली काबीज केली. भारतीय जनता पक्षाला एक आकडी यश मिळाले आणि काँग्रेस तर कुठल्या कुठे गडप झाली हे कळलेच नाही. त्यानंतर चांगल्या गुणवत्तापूर्ण शाळा, मोफत वीज, विनामूल्य पाणी आणि गरिबांना मोफत आणि इतरांना परवडेल अशा वैद्यकीय सेवा दिल्यामुळे आम आदमी पक्ष पुन्हा मोठ्या बहुमताने सत्तेवर आला. या काळात काँग्रेसला ना नेता होता ना नेतृत्व, यामुळे केजरीवाल यांनी गुजरातवर आपले लक्ष केंद्रित केले. तिथेही काँग्रेसला चांगलाच फटका बसला. दरम्यान ज्या गोव्यात काँग्रेसचे बऱ्यापैकी बस्तान बसलेले होते. तिथेही आम आदमी पक्ष पोहोचला. सध्या ज्या मद्य घोटाळ्याच्या आरोपामुळे केजरीवाल आणि त्यांच्या अनेक साथीदारांना तुरुंगवास भोगावा लागला. कारण त्या पैशाने गोव्याची निवडणूक लढण्यात आली. असा ईडी आणि सीबीआयचा दावा आहे. पण अजून तरी ते सिद्ध झाले नाही. त्यानंतरचे राज्य होते ते म्हणजे पंजाब. काँग्रेसने नवज्योतसिंग सिद्धू यांच्या नादी लागून तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पायउतार केले. नवख्या गड्याच्या हातात सत्ता सूत्रे दिली आणि आपले राज्य अलगदपणे आम आदमी पक्षाच्या हाती सोपविले. तरीही आम आदमी पक्षाला ज्या भागात भाजपचे प्राबल्य होते. तेथे जराही पाय पसरता आले नाहीत हे सत्य आहे. काँग्रेस पक्षाची दशा आणि दिशा राहुल गांधी यांच्या दोन भारत जोडो यात्रांमुळे प्रथमच बदलली. आता काँग्रेसने नवे रुपडे धारण केल्यानंतर राहुल गांधी यांच्या नेतृत्वाला भारतभर मान्यता मिळाली. त्याचा प्रत्यय गेल्या लोकसभा निवडणुकीत पंजाब मध्येच आपला आला. पंजाबात काँग्रेसने लोकसभेच्या आठ जागा जिंकल्या. काँग्रेस फार्मात आल्यामुळे ज्या ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे. त्या त्या राज्यात आता आपल्याला फारसा भाव मिळेल अशी परिस्थिती नाही. हे आम आदमी पक्षाच्या लक्षात आले. दिल्लीला लागूनच असलेल्या हरियाणा मध्ये काँग्रेस बरोबर युती करण्याची तयारी आपने दर्शविली आणि आपने दहा जागांची मागणी केली. काँग्रेस सात जागा द्यायला तयार होती. आजच्या घडीला काँग्रेसचा वारू सबंध हरियाणाभर असा काही उधळतो आहे की, त्यात इतर सगळे पक्ष गलीतगात्र होण्याच्या अवस्थेत दिसत आहेत. अशा स्थितीला आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेऊन स्वतःच परीक्षा देण्याचे ठरवले असावे. आम आदमी पक्ष किती जागा लढवतो आणि त्यातील किती जागी जिंकतो. याचे उत्तर ही निवडणूक देणार आहे. सध्याच्या परिस्थितीत हरियाणा, जम्मू काश्मीर, झारखंड आणि महाराष्ट्र या चारही राज्यात आम आदमी पक्षाला फारसे स्थान आहे. असे दिसत नाही. परंतु त्यांच्या हाती दोन राज्ये असल्यामुळे हातपाय पसरवण्याचे काम आम आदमी पक्षाला करावेच लागते. मुख्यमंत्री केजरीवाल लवकरच तुरुंगाबाहेर येतील असे दिसते. पण आता इंडिया आघाडीतील हे दोन्ही पक्ष आपसात लढले. तर दोघांनाही नुकसान सोसावे लागेल, एवढे मात्र खरे आहे. म्हणूनच आगामी काळात आम आदमी पक्ष आणि तृणमूल काँग्रेस हे दोघेही केंद्रात काँग्रेस बरोबर राहतील. पण राज्यात मात्र स्वतंत्रपणे लढतील असे दिसते. एकूणच आम आदमी पक्षाला भविष्यात काँग्रेस सोडून इतर राज्यात कसरत करावी लागेल. चार राज्यांच्या निवडणुकांचे घोडामैदान समोर आहे. त्यांच्या निकालानंतर कोणाचा कुठे आणि कसा निकाल लागतो हे बघणे, एवढेच आपले हाती आहे.

# UPI चा यशस्वी प्रवास: संपूर्ण जगावर प्रभाव टाकणारी 'डिजिटल क्रांती'!

भारताचा युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) 2016 मध्ये सुरू झाल्यापासून डिजिटल पेमेंट लँडस्केपमध्ये गेम-चेंजर म्हणून उदयास आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाची एक संस्था असलेल्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (NPCI) विकसित केलेल्या UPI ने लाखो भारतीयांच्या दैनंदिन आर्थिक जीवनात स्वतःला वेगाने समाकलित केले आहे, ज्यामुळे व्यवहार पद्धतीत क्रांती झाली आहे. रिसर्च असे दर्शवतो की UPI व्यवहाराच्या प्रमाणात 1 टक्के वाढ जीडीपी वाढीच्या 0.03 टक्के वाढीशी संबंधित आहे, ज्यामुळे आर्थिक विस्तारामध्ये UPI ची भूमिका अधोरेखित होते. हा लेख UPI ची स्फोटक वाढ, भारतीय अर्थव्यवस्थेवरील त्याचा प्रभाव, वापरकर्त्यांमध्ये त्याने मिळवलेला विश्वास आणि फिनटेकमध्ये भारताला जागतिक नेता म्हणून स्थान देण्याच्या क्षमतेचा शोध घेतो.

**UPI ची वाढ आणि पायाभूत सुविधा**

UPI चा विकास प्रवास एका विलक्षण यशापेक्षा कमी नाही. जानेवारी 2018 मध्ये त्याद्वारे 80 कोटी व्यवहार होत होते, जे जुलै 2024 मध्ये 14.4 अब्ज झाले. आज भारतातील 80 टक्के डिजिटल व्यवहार UPI द्वारे होतात. भारताच्या विद्यमान बँकिंग पायाभूत सुविधांशी UPI चे अखंड एकत्रीकरण आणि मोबाइल इंटरनेटच्या व्यापक वापरामुळे हा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला गेला आहे.

**UPI चे प्रमुख पायाभूत घटक खालीलप्रमाणे आहेत:**

मोबाइल इंटरनेटची उपलब्धता: देशभरात मोठ्या प्रमाणावर UPI वापरण्याचे मुख्य कारण म्हणजे देशभरात मोबाईल ब्रॉडबँड सेवेचा झपाट्याने होणारा विस्तार हे आहे. जुलै 2024 पर्यंत, देशातील 42.4 कोटी लोकसंख्येकडे स्वस्त स्मार्टफोन होते, ज्याच्या मदतीने ते UPI सारखे डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म वापरत आहेत.


बँकिंग प्रणालीशी कनेक्टिव्हिटी: UPI चे यश देशाच्या संघटित बँकिंग प्रणालीशी त्याच्या कनेक्टिव्हिटीशी खोलवर जोडलेले आहे. JAM च्या त्रिकोणाने म्हणजेच जन-धन खाते, आधार आणि मोबाईल कनेक्टिव्हिटीने जून 2024 पर्यंत देशातील अंदाजे 90 कोटी लोकसंख्येला आर्थिक सेवा प्रदान करण्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आधार आणि UPI: UPI ची आधारशी जोडणी- 1.3 अब्ज भारतीयांचा समावेश असलेली एक डिजिटल ओळख प्रणाली सुरक्षित आणि विश्वासार्ह व्यवहार सुनिश्चित करते, जे वापरकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी मूलभूत आहे.

विश्वास हा पाया आहे ज्यावर UPI चे यश निर्माण झाले आहे. UPI वर वापरकर्त्यांचा विश्वास वाढवण्यात दोन प्रमुख घटकांचे योगदान आहे. प्रथम, डिजिटल इंडिया उपक्रमाचा एक भाग म्हणून भारत सरकारने UPI ला दिलेल्या पाठिंब्यामुळे त्याला विश्वासार्हता आणि वैधता मिळाली आहे. प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY) सारख्या सरकारी पाठिंब्यावर चालणाऱ्या उपक्रमांचा मोठ्या प्रमाणावर अवलंब हा विश्वास, UPI चे एकत्रीकरण आणि आर्थिक समावेशकता कार्यक्रमांचा पुरावा आहे.

दुसरे म्हणजे, UPI चे आधारशी एकत्रीकरण एक मजबूत सुरक्षा चौकट प्रदान करते, ज्यामुळे व्यवहार सुरक्षित आहेत आणि ओळख विश्वासार्हतेने प्रमाणित आहे याची खात्री होते. याव्यतिरिक्त, UPI रिअल-टाइम व्यवहार अपडेट्स आणि सुलभ विवाद निराकरण प्रदान करते, ज्यामुळे वापरकर्त्यांना नियंत्रणात असल्यासारखे पारदर्शक वातावरण निर्माण होते.

भारताच्या अर्थव्यवस्थेवर UPI चा प्रभाव लक्षणीय आहे. यामुळे केवळ आर्थिक व्यवहारच सुव्यवस्थित झाले नाहीत तर आर्थिक समावेशन आणि जीडीपी वाढीसाठीही ते एक महत्त्वपूर्ण चालक ठरले आहे. औपचारिक वित्तीय व्यवस्थेत 30 कोटींहून




अधिक रक्कम आणण्यात UPI ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पंतप्रधान जन धन योजना उपक्रमांतर्गत उघडल्या गेलेल्या नवीन बँक खात्यांची संख्या 2018 ते 2024 दरम्यान 50 टक्क्यांनी वाढली, ज्यानंतर UPI स्वीकारण्यात झपाट्याने वाढ झाली आहे.

**संशोधन पद्धती आणि निष्कर्ष**

UPI व्यवहारांचे प्रमाण समजून घेण्यासाठी आणि धनादेश, क्रेडिट कार्ड आणि ए. टी. एम. व्यवहारांसह आर्थिक व्यवहारांच्या इतर साधनांशी तुलना करण्यासाठी आम्ही 2016 मध्ये UPI पहिल्यांदा सुरू झाल्यापासून 7 वर्षांहून अधिक काळापासूनच्या डेटाचे विश्लेषण केले. त्याची तुलना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून (RBI- 2023) नोंदवलेल्या भारताच्या तिमाही जीडीपी आकडेवारीशी आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने अधिकृत तिमाही आकडेवारीनुसार नोंदवलेल्या इंटरनेट, मोबाइल आणि बँक खात्यांच्या (TRAI 2023) प्रमाणाशी केली. आम्ही सर्व डेटामध्ये रेग्रेशनच्या विश्लेषणाच्या गृहीतेनुसार या डेटाची चाचणी केली.

UPI व्यवहारांचे प्रमाण आणि मायक्रोलोन वितरण यांच्यातील परस्परसंबंधासह, 2018 ते 2023 या कालावधीत मायक्रोलोन वितरणात 100 टक्क्यांनी वाढ झाली.

विश्लेषण असे दर्शविते की UPI व्यवहाराच्या प्रमाणात 1 टक्के वाढ जीडीपी वाढीच्या 0.03 टक्क्यांच्या वाढीशी संबंधित आहे, आर्थिक विस्तारामध्ये UPI ची भूमिका अधोरेखित करते. परस्परसंबंध मजबूत आहे हे दर्शविते की UPI चा अवलंब हा गेल्या 7 वर्षातील भारताच्या जीडीपी वाढीच्या पद्धतीचा एक मजबूत सूचक आहे. UPI ने विशेषतः ग्रामीण भागात तसेच शहरी गरीबांमध्ये पत सुलभतेवर सकारात्मक परिणाम केला आहे. 2018 ते 2023 पर्यंत मायक्रोलोन वितरण 100 टक्क्यांनी वाढले, UPI व्यवहाराचे प्रमाण आणि मायक्रोलोन वितरण यांच्यातील संबंध दर्शवते.

**जागतिक महत्त्वाकांक्षा: UPI बनले सॉफ्ट पॉवर टूल**

इतर देशांमध्ये UPI निर्यात करण्याची भारताची महत्त्वाकांक्षा, विशेषतः डिजिटल फायनान्समध्ये, एक विश्वासार्ह विकास भागीदार म्हणून आपले स्थान वाढवण्यासाठीचे एक धोरणात्मक पाऊल दर्शवते. देशांतर्गत UPI च्या यशामुळे जपान, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स आणि आता मालदीवसारख्या अनेक देशांकडून आर्थिक आधुनिकीकरणाच्या त्यांच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून स्वारस्य निर्माण झाले आहे. जागतिक स्तरावर UPI ला प्रोत्साहन देऊन भारत तांत्रिक कुटनीती मध्ये गुंतला आहे. इतर बाजारपेठांमध्ये UPI ची यशस्वीरित्या अंमलबजावणी केल्यास भारत स्केलेबल आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करण्यात अग्रेसर ठरू शकेल.

UPI चे यश हे आर्थिक भागीदारीसाठी नवीन संधी निर्माण करून, नवोपक्रमातील विश्वासार्ह भागीदार होण्याच्या भारताच्या प्रयत्नाचे प्रतीक ठरू शकते.

UPI चा जागतिक प्रसार केवळ भारताच्या तांत्रिक क्षमतांवर प्रकाश टाकणार नाही तर त्याचा सांस्कृतिक आणि आर्थिक प्रभावही वाढवेल. UPI चे यश हे आर्थिक भागीदारीसाठी नवीन संधी निर्माण करून, नवोन्मेषात एक विश्वासार्ह भागीदार होण्याच्या भारताच्या प्रयत्नांचे प्रतीक ठरू शकते. याचे एक आश्वासक उदाहरण म्हणजे 9 ऑगस्ट 2024 रोजी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. जयशंकर यांचा माले दौरा आणि राष्ट्रपती मोहम्मद अब्बास यांनी केलेले त्यांचे हार्दिक स्वागत. त्यानंतर 10 ऑगस्ट 2024 रोजी भारत आणि मालदीव यांनी या द्वीपसमूह राष्ट्रात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस सुरू करण्यासाठी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

**आव्हाने आणि मर्यादा**

यश मिळाल्यानंतरही, UPI ला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो, ज्यांची त्याच्या निरंतर वाढीसाठी दखल घेणे आवश्यक आहे. क्षमता असूनही, UPI ची निर्यात ही आव्हानांपासून मुक्त नाही. जपानसारख्या विकसित बाजारपेठा, जिथे आधीपासूनच स्थापित वित्तीय प्रणाली अस्तित्वात आहेत, त्या स्वीकारण्यात महत्त्वपूर्ण अडथळे निर्माण करतात. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी धोरणात्मक सहकार्य आणि धोरणात्मक पाठबळ आवश्यक असेल. यामध्ये भारताकडून तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांना थेट अनुदान देणे समाविष्ट असू शकते.

डेटा गोपनीयता आणि सुरक्षितता: व्यवहाराच्या वाढत्या प्रमाणासह, डेटा संरक्षण आणि सायबर सुरक्षिततेबद्दलची चिंता अधिक स्पष्ट झाली आहे. वापरकर्त्याचा विश्वास कायम ठेवण्यासाठी वैयक्तिक आणि आर्थिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी मजबूत उपायांची आवश्यकता असेल.

प्रादेशिक विषमता: UPI चा व्यापक स्वीकार केला जात असला तरी, इंटरनेट प्रवेश आणि आर्थिक साक्षरता यासारख्या घटकांमुळे प्रभावित लक्षणीय प्रादेशिक विषमता आहेत. व्यापक आर्थिक समावेशन साध्य करण्यासाठी ही तफावत भरून काढणे आवश्यक आहे.

पारंपारिक पेमेंट सिस्टमसह एकत्रीकरण: UPI अद्याप क्रेडिट कार्ड आणि चेक सारख्या पारंपारिक पेमेंट पद्धती पूर्णपणे बदलू शकले नाही. UPI चा वापर मुक्त ठेवताना या प्रणालींशी कोणताही संघर्ष न होता UPI चा वापर सुरू ठेवता येईल याची खात्री करणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. असे केल्याने, UPI ला मास्टरकार्ड आणि व्हिसा सारख्या पारंपारिक प्रणालींशी स्पर्धा करण्यासाठी तयार करता येईल. सध्या, आर्थिक व्यवहारांच्या पारंपारिक खेळाडूंचे प्राइस टू बुक रेशो (सुमारे 56 टक्के) आहे, जे सूचित करते की ग्राहक आणि भागधारक या पारंपारिक चॅनेलला त्यांच्या खात्यांमध्ये नोंदवलेल्या आकडेवारीपेक्षा 56 पट अधिक मूल्य देतात.

UPI हे पेमेंट प्लॅटफॉर्मपेक्षा अधिक आहे; हा भारताच्या नावीन्यपूर्ण क्षमता आणि जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत नेतृत्व करण्याच्या क्षमतेचा पुरावा आहे. विशेषतः डेटा गोपनीयता आणि जागतिक निर्यातक्षमतेबाबत आव्हाने कायम असताना, UPI ची यशोगाथा त्याच्या खऱ्या स्वरूपापासून खूप दूर आहे. भारत आपल्या सीमेपलीकडे UPI ची व्याप्ती वाढवण्याच्या क्षमतेचा शोध घेत असताना, हा मंच भारताच्या तांत्रिक मुत्सद्देगिरीचा आधारस्तंभ आणि जागतिक मंचावर आपली छाप वाढवण्यासाठी एक शक्तिशाली साधन बनू शकतो.


UPI हे पेमेंट प्लॅटफॉर्मपेक्षा अधिक आहे; हा भारताच्या नावीन्यपूर्ण क्षमता आणि जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत नेतृत्व करण्याच्या क्षमतेचा पुरावा आहे.

जगाने UPI चा अवलंब करावा हे सुनिश्चित करण्यासाठी, भारताच्या धोरण निर्मात्यांसमोर भारतातील प्रशिक्षण केंद्रे आणि व्यवस्थापन संस्थांमध्ये केस स्टडी म्हणून शिकवणे हे महत्त्वाचे आव्हान आहे.

# AI चालित भविष्यानुसार भारताच्या वर्कफोर्सची निर्मिती

जनरेटिव्ह AI (GAI) च्या जलद प्रसारामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये (AI) क्रांती झाली आहे. हे क्षेत्र आता जागतिक अर्थव्यवस्था आणि कामगार बाजारांच्या संरचनेत मूलभूत बदल घडवून आणण्यास सज्ज आहे. ही बाब जितकी भारताला लागू आहे तितकीच ती उर्वरित जगासही लागू आहे. पूर्वीच्या औद्योगिक आणि इंटरनेट क्रांतीप्रमाणे, बाजारपेठेतील काही क्षेत्रांमध्ये व्यत्यय आणण्याची क्षमता AI क्षेत्रामध्ये आहे. त्याचप्रमाणे इतर क्षेत्रांमध्ये मानवी क्षमता वाढवणे आणि पूर्वी अस्तित्वात नसलेल्या नवीन नोकरीच्या संधी निर्माण करणे याही बाबी साध्य करण्याची क्षमता आहे. AI मुळे अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर परिणाम होणार आहे. अर्थात हा परिणाम प्रत्येक क्षेत्राप्रमाणे बदलत जाईल असे लिंक्डीनच्या डेटामधून सुचित करण्यात आले आहे. GAI च्या स्वरूपामुळे त्यास वेळकाढू कामे पुर्ण कार्यक्षमतेने करता येतात तसेच कामगारांना त्यांची उत्पादकता वाढवण्याची अनुमती मिळते आणि टास्क बेस्ड वर्कफोर्सपासून स्किल फर्स्ट वर्कफोर्सकडे जाण्याचे यातून संकेत मिळतात. ट्रॅक करण्यात ४१००० कौशल्यांपैकी फक्त ५०० कौशल्याची जीआयद्वारे नक्कल करता येते म्हणून जीआयचा उपयोग हा नोकरीच्या बहुतांश संधी आणि कौशल्ये वाढवण्यासाठी करता येऊ शकतो. AI कौशल्यांवर अधिक भर देणारे रिक्रुटर्स आणि लिंक्डीनवर AI जॉबची दुप्पट पोस्टिंग हे जीआयचे सकारात्मक फायदे आहे.

येथे उल्लेख करण्यात आलेली AI कौशल्ये ही केवळ मशीन लर्निंग आणि नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग यांसारख्या मुख्य १२१ हार्ड AI कौशल्यांपुरती मर्यादित नसून विविध समस्या सोडवणे, संवाद आणि महत्त्वाची विचार-कौशल्ये यांसारख्या मूळत: मानवी, मूलभूत तसेच पूरक सॉफ्ट स्किल्ससाही यात समावेश होतो. जीआय हे विशिष्ट कार्ये पार पाडण्यात पारंगत होत असल्याने, या सॉफ्ट स्किल्सच्या मागणीत लक्षणीय वाढ होत आहे. ही कौशल्ये असणाऱ्यांना हार्ड स्किल्स असलेल्यांपेक्षा बढती मिळण्याची शक्यता १३ टक्क्यांहून अधिक आहे. म्हणून, AI प्रदान करत असलेल्या संधींचा पुरेसा फायदा घेण्यासाठी, कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कुशल लोकसंख्येसाठी हार्ड आणि सॉफ्ट अशा दोन्ही प्रकारच्या कौशल्यांमध्ये पुरेसे कुशल असणे आवश्यक आहे. याद्वारे ते लोकांच्या कौशल्यांसोबत AI



कौशल्ये संतुलित करू शकतात.

विशेष म्हणजे, हार्ड स्किल्ससह भारताची वर्कफोर्स ही AI क्रांतीचा फायदा घेण्यासाठी सुसज्ज आहे. जागतिक स्तरावर भारताचा सापेक्ष AI कौशल्य प्रवेश दर सर्वाधिक आहे. इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा जीआय वापरण्याची भारतीय लोकसंख्येची क्षमता तिप्पट आहे आणि भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या AI टॅलेंट पूलपैकी एक आहे. भारतातील तरुण, विशेषत: जेनझीज हे नोकरीच्या बाजारपेठेत स्पर्धात्मक धार टिकवून ठेवण्यासाठी स्वत:ला वेगाने विकसित करत आहेत. भारताच्या स्टार्ट-अप इकोसिस्टमने AI सह नवनवीन वापरासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याची क्षमता आधीच दाखवली आहे ही एक उल्लेखनीय बाब आहे.

परंतू, लिंक्डइनच्या डेटाने AIच्या आर्थिक फायद्यांचे अधिक न्याय्य आणि शाश्वत वितरण सुनिश्चित करण्यासाठी तीन विशिष्ट अडचणींवर प्रकाश टाकला आहे. या अडचणींवर मात करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम, आपण सातत्यपुर्ण कौशल्याच्या युगात प्रवेश करत आहोत. यामध्ये विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्यासाठी आणि आउटडेटेड होण्यापासून वाचण्यासाठी कामगारांनी त्यांची कौशल्ये वेगाने आणि सतत वाढवली पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे, नजीकच्या भविष्यात आवश्यक असणारी यातील बहुतांश कौशल्ये ही सॉफ्ट स्किल्स आहेत. ही सॉफ्ट स्किल्स इंडस्ट्री आणि सेक्टर अग्नोस्टिक आहेत. ही बाब उच्च शिक्षण आणि करिअरच्या प्रगतीच्या पारंपारिक मॉडेलला आव्हान देणारी आहे. पारंपारिक मॉडेल्समध्ये उद्योग-विशिष्ट हार्ड-स्किल्स ही पदवी आणि करिअर सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी होती. ही बाब ओळखून, बहुसंख्य कंपन्या (७६ टक्के) आधीच त्यांच्या कर्मचाऱ्यांना अपस्किलिंगमध्ये मदत करत आहेत. विशेष म्हणजे, लिंक्डइन स्वतः व्यावसायिकांना त्याच्या जनरेटिव्ह AI प्रोफेशनल प्रमाणपत्राद्वारे करिअरच्या नवीन संधी शोधण्यात मदत करत आहे. तथापि, भारताच्या आकारमानाच्या आणि विविधतेच्या श्रमिक बाजारपेठेसाठी, तंत्रज्ञानाचे आर्थिक फायदे पूर्णपणे मिळवण्यासाठी संपूर्ण कामगार स्पेक्ट्रममध्ये काही बेसलाइन कोर GAI आणि GAI पूरक सॉफ्ट कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम, आपण सातत्यपुर्ण कौशल्याच्या युगात प्रवेश करत आहोत. यामध्ये विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्यासाठी आणि आउटडेटेड होण्यापासून वाचण्यासाठी कामगारांनी त्यांची कौशल्ये वेगाने आणि सतत वाढवली पाहिजेत.

दुसरी बाब म्हणजे ज्या नोकऱ्यांमध्ये अडव्हांस डिग्री आवश्यक आहे आणि सामान्यत: त्या जास्त पगाराच्या आहेत अशा नोकऱ्यांमध्ये अल्पावधीत जीआयमुळे व्यत्यय येण्याची शक्यता आहे. या आधीच्या तंत्रज्ञानातील क्रांतीमध्ये प्रामुख्याने लेबर स्पेक्ट्रमच्या खालच्या स्तरावर परिणाम झाला होता. या पार्श्वभुमीवर हा एक अभूतपूर्व आर्थिक विकास आहे, जिथे आर्थिक स्तराचा वरचा भाग तांत्रिक बदलामुळे खालच्या भागापेक्षा अधिक प्रभावित होणार आहे. भारताची आयटी वर्क फोर्स ही भारताच्या मध्यमवर्गाचा आणि आर्थिक बाबींचा कणा आहे. नजीकच्या भविष्यात, भारताच्या आयटी वर्क फोर्सवर GAI वरील वाढत्या अवलंबनामुळे परिणाम होण्याची शक्यता आहे. हे अवलंबन वेळेत कमी केले नाही तर काही आर्थिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे, असे सुचित झाले आहे. तंत्रज्ञान, माहिती आणि मीडिया क्षेत्रामध्ये GAIद्वारे व्यत्यय येण्याची सर्वाधिक शक्यता आहे, हे ही लिंक्डइनच्या डेटाद्वारे सिद्ध झाले आहे. अडव्हांस डिग्री असलेल्यांना उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या संधीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. तसेच त्यांच्याकडे आधीपासूनच काही मूलभूत तांत्रिक क्षमता असल्याने पुरेशा उच्च कौशल्याच्या संधी अस्तित्वात आहेत.

तिसरी बाब म्हणजे, श्रमिक बाजारपेठेतील लिंग या घटकावर GAI असममित प्रभाव टाकण्याची शक्यता आहे. AIमुळे उपलब्ध होत असलेल्या नोकरीच्या संधींमध्ये महिलांवर अधिक नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच नवीन संधींचा फायदा घेण्यासाठीचे उचित कौशल्य महिलांकडे असण्याचीही शक्यता कमी आहे. अर्थात AIसाठी ही बाब विशेष नसली तरी यामुळे तंत्रज्ञान उद्योगातील मोठा संरचनात्मक फरक अधोरेखित झाला आहे. इतर अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेत महिलांचा वाटा तुलनेत कमी असल्याने ही भारतासाठी चिंताजनक बाब आहे. लिंक्डइनच्या इकॉनॉमिक ग्राफ डेटानुसार, AI टॅलेंटमध्ये केवळ २५.६ टक्के महिला सहभागी आहेत. त्यामुळे महिलांनी AI लाटेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक AI कौशल्ये प्राप्त करण्यासाठी संधी निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

स्किल इंडिया मिशनमध्ये AI मुळे मिळणाऱ्या संधींचा फायदा घेण्यासाठी भारतातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या सॉफ्ट स्किल्ससह GAI कौशल्यांचे मॉड्यूल समाविष्ट केले जाऊ शकते. या चिंता विशिष्ट धोरणात्मक पुढाकाराने दूर केल्या जाऊ शकतात. उदाहरणार्थ, स्किल इंडिया मिशनमध्ये AIमुळे मिळणाऱ्या संधींचा फायदा घेण्यासाठी भारतातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या सॉफ्ट स्किल्ससह GAI कौशल्यांचे मॉड्यूल समाविष्ट केले जाऊ शकते. यासोबतच, शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना लहान वयातच जीआयची ओळख करून दिल्यास त्याचा फायदा त्यांना तंत्रज्ञान आणि त्याच्या अनुप्रयोगांशी परिचित होण्यासाठी होईलच पण त्यासोबत भारताच्या भावी कर्मचाऱ्यांच्या बेसलाइन कौशल्याच्या स्तरांमध्ये सुधारणा करण्यासाठी देखील हे शिक्षण उपयुक्त ठरणार आहे. व्यापक व सतत विकसित होत असलेल्या कौशल्य फ्रेमवर्क आणि अधिक उद्योग-शैक्षणिक सहकार्यावर आधारित प्रशिक्षणावर भर देणाऱ्या लवचिक शिक्षण प्रणालीमुळे श्रमशक्तीच्या क्षमता बदलत्या रोजगाराच्या आवश्यकतांशी सुसंगत होण्यास मदत होणार आहे. शेवटी, विद्यमान आर्थिक अंतर भरून काढण्यासाठी महिला आणि उपेक्षित गटांना AI कौशल्ये अवगत करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या महत्त्वाच्या धोरणांवर विशेष भर दिला जाऊ शकतो.

महत्त्वाचे म्हणजे, GAI ला भारतातील अध्यापनशास्त्र आणि कौशल्य प्रशिक्षणाचे एक अनिवार्य साधन बनवले जाऊ शकते आणि प्रशिक्षण व ज्ञान हस्तांतरणाचा खर्च लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी त्याचा फायदा घेतला जाऊ शकतो. जीआयमुळे विविध भाषांमध्ये अचूक भाषांतर करता येऊ शकते. याचा वापर करून भारतातील कामगार त्यांच्या आवडीच्या भाषेत कौशल्यांचे शिक्षण घेऊ शकतात. काही परिस्थितींमध्ये अपस्किल करण्यासाठी इंग्रजीमध्ये काही प्रमाणात प्रवीणता असणे आवश्यक असते. याच पार्श्वभुमीवर सध्या अस्तित्वात असलेल्या भाषिक अडथळ्यावर मात करता येऊ शकते.

AI युगामध्ये विविध संधींचा फायदा घेण्यासाठी कामगार आणि धोरणकर्त्यांच्या विचारांमध्ये बदल आणणे गरजेचे आहे. जॉब मार्केटमधील कौशल्यांच्या मागणीच्या तुलनेत AI कौशल्यांचा विचार करत असताना, भारतीय श्रमशक्तीची एकूण तयारी आणि स्थिती यांचा बारकाईने अभ्यास केल्यास विद्यमान विचारधारा आणि कृती यांच्यात बदल घडवता येऊ शकेल.

# गणेशोत्सवादरम्यान 55 किलो सोन्याची विक्री

मुंबई

येत्या ऑक्टोबरपासून देशभरात सण आणि लग्नसराईचा हंगाम सुरू होणार आहे. या संधीचा फायदा घेण्यासाठी ग्राहकोपयोगी वस्तू बनवणाऱ्या एफएमसीजी कंपन्यांपासून ते कन्झ्युमिर ड्यूरेबल कंपन्या आणि सोन्याच्या किरकोळ विक्रेत्यांनी तयारी सुरू केली आहे.



सणासुदीच्या काळात टीव्ही, रेफ्रिजरेटर आणि दुचाकी आणि चारचाकी वाहने खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या (NBFCs) ही त्यांचे धोरण अवलंबत आहेत.

सार्वत्रिक निवडणुकांमुळे पहिल्या सहामाहीत वाहन ते कन्झ्युमर ड्युरेबल क्षेत्रांमध्ये मंदी होती. सोन्याच्या विक्रीतही मंद गतीने वाढ झाली. आता उत्पादकांना दुसऱ्या सहामाहीत विकास दरात सुधारणा होऊन सणासुदीचा हंगाम चांगला जाण्याची अपेक्षा आहे. तज्ज्ञांच्या मते, आगामी सणांच्या काळात विक्री अपेक्षित आहे.

मुंबईत सध्या सुरू असलेल्या गणपती उत्सवावरून याचा अंदाज येतो. उत्सवादरम्यान केवळ गणपतीला अर्पण करण्यासाठी आतापर्यंत ५५ किलो सोन्याची विक्री झाली आहे. गणपती उत्सवातील मागणी पाहता नवरात्र, धनत्रयोदशी आणि दिवाळीसाठी व्यावसायिकांमध्येही उत्साह आहे. मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाला आतापर्यंत ४८ लाखांहून अधिक रुपयांचा दान देण्यात आला आहे.



# गणपती बाप्पा मोरया...

*राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान वर्षा येथील श्री गणेशाचे दर्शन घेतले आणि पूजन केले. याप्रसंगी राज्यपालांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी 'शासन आपल्या दारी' या पुस्तकाची प्रत व श्री गणेशाची मूर्ती भेट म्हणून राज्यपालांना दिली.*

# दूषित खाण्यापिण्यामुळे दररोज 28 जण आजारी

## गॅस्ट्रो आणि हिपॅटायटीसच्या संसर्गाने मुंबईकर हैराण

मुंबई

ऑगस्टमध्ये दूषित खाण्यापिण्यामुळे दररोज 28 जणांना पोटात संसर्ग होत होता. मुंबईकरांमध्ये गॅस्ट्रो आणि हिपॅटायटीसच्या संसर्गाची प्रकरणे वाढत आहेत. BMC आरोग्य विभागाने लोकांनी बाहेरचे अन्न खाणे टाळावे आणि उकळलेले पाणी प्यावे असे आवाहन केले आहे. दूषित अन्नामुळे पोटाशी संबंधित आजार होण्याचा धोका असतो. दूषित पाणी प्यायल्याने हिपॅटायटीस ए आणि ई होतो. बीएमसी आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या एका महिन्यात गॅस्ट्रोचे ६९४ आणि हिपॅटायटीसचे १६९ रुग्ण आढळले आहेत. अतिसार, उलट्या, पोटदुखी, पेटके अशा तक्रारी घेऊन रुग्ण बीएमसी रुग्णालयात येत आहेत. अनेकवेळा पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनला गळती लागल्याने किंवा पाणी साठवणाऱ्या सोसायटीच्या टाकीची स्वच्छता न केल्याने त्यात बुरशी निर्माण होते. दूषित पाणी प्यायल्याने हिपॅटायटीसचा धोका वाढतो. बीएमसीने 34512 लोकांना ओआरएस पावडर आणि 22227 क्लोरीन गोळ्या पाणी शुद्ध करण्यासाठी वितरित केल्या आहेत. बीएमसीचे कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी सांगितले की, लोकांनी बाहेरील आणि अस्वच्छ ठिकाणी तयार केलेले अन्नपदार्थ खाणे टाळावे. हिपॅटायटीस टाळण्यासाठी, उकळलेले पाणी प्या.



# शिष्यवृत्तीत एकसमानता आणण्यासाठी समिती गठीत

## सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय जारी

मुंबई

राज्य सरकारच्या अखत्यारीतील विविध संस्थांकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, निर्वाह भत्ता आदींमध्ये समानता आणण्यासाठी वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी समिती गठित करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाने मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

राज्य मंत्रिमंडळाने १९ ऑक्टोबर २०२३ च्या बैठकीत शिष्यवृत्ती धोरणात समानता आणण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आता नेमण्यात आलेल्या समितीत सदस्य म्हणून नियोजन, इतर मागासवर्ग आणि बहुजन कल्याण विभाग , आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव , उच्च आणि तंत्रशिक्षण तसेच अल्पसंख्याक विभागाचे प्रधान सचिव यांचा समावेश करण्यात आला आहे. तर सामाजिक न्याय विभागाचे सचिव हे या समितीचे सदस्य सचिव असतील.

आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन आणि प्रशिक्षण प्रबोधिनी तसेच इतर स्वायत्त संस्था यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आणि भविष्यात प्रस्तावित असलेल्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती,वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता, स्वाधार, स्वयंम अशा विविध प्रकारच्या योजनांमध्ये एकसमानता असावी, यासाठी ही समिती सर्वंकष धोरण निश्चित करणार आहे.

दरम्यान, सारथी, महाज्योतीच्या विद्यार्थ्यांप्रमाणे बार्टीमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेतील सन २०२२ च्या ७६३ विद्यार्थ्यांची जाहिरातीनुसार आलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून तसेच शपथपत्र घेऊन पात्र विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यास सामाजिक न्याय विभागाने मान्यता दिली आहे.

### आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी प्रकरण

# सायबर फसवणुकीत अयशस्वी झाल्यास विजेचे झटके द्यायचे

मुंबई

राष्ट्रीय तपास संस्थेने (NIA) मंगळवारी उच्च प्रोफाइल आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी आणि सायबर फसवणूक प्रकरणात लाओसस्थित लाँग शेंग कंपनीच्या सीईओविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. या वर्षी जूनमध्ये एनआयए मुंबईने सुदर्शन दराडे याला अटक केली होती, ज्याचे आरोपपत्रात मुख्य आरोपी म्हणून नाव आहे. दराडे हा या प्रकरणातील सहावा आरोपी आहे. जेरी जेकब आणि गॉडफ्रे अल्वारेस यांच्यानंतर सुदर्शनला अटक करण्यात आली होती.

दराडे यांच्या मोबाईलमधून मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह साहित्य सापडले. दराडे यांनी एनआयएला परदेशी नागरिक निऊ निऊ आणि एल्विस डू यांच्यासह आणखी एक आरोपी सनी गोन्साल्विस यांची माहिती दिली आहे, जे अद्याप फरार आहेत. फरार लोकांचा सुगावा मिळवण्यासाठी एनआयए माहिती गोळा करत आहे. दराडे यांची कंपनी लाँग शेंग लाओस पीडीआरच्या बोकेओ प्रांतात असल्याचे एनआयएच्या तपासात उघड झाले आहे. गोल्डन ट्रँगल लाओस पीडीआरमध्ये बँकॉकमधून नोकरीच्या ऑफरच्या बहाण्याने तरुणांची तस्करी करण्याच्या रॅकेटमध्ये व्हॉट्सअ‍ॅपचा सहभाग होता. कंपनी मुलाखती घेत असे आणि अपॉइंटमेंट लेटर पाठवत असे, ज्यांना गंतव्यस्थानावर पोहोचल्यावर ऑनलाइन क्रिप्टो चलनाची फसवणूक करण्यास भाग पाडले जात असे. दराडे यांच्या सूचनेवरून जेकबने भारतीय तरुणांना लाओसमधील गोल्डन ट्रँगलमध्ये नेण्याची व्यवस्था केली. तस्करीत तरुणांनी सायबर फसवणुकीत सहभागी होण्यास नकार दिल्याने त्यांना उपाशी ठेवून मारहाण करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. सोशल मीडियावर संभाव्य पीडितांशी मैत्री करण्याचे त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल काही तरुणांना विजेचे झटकेही देण्यात आले.

# अस्पष्ट आरोपांच्या आधारे 'गिफ्ट डीड' रद्द करता येणार नाही: उच्च न्यायालय

मुंबई

ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरण काळजी नसल्याच्या अस्पष्ट आरोपांच्या आधारे भेटवस्तू डीड रद्द करू शकत नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ७३ वर्षीय वृद्ध महिलेची काळजी न घेतल्याने न्यायाधिकरणाने मुलीच्या नावे गिफ्ट डीड रद्द केली होती. याविरोधात मुलगी आणि जावयाने न्यायालयात याचिका दाखल केली होती.



याचिकेत न्यायाधिकरणाच्या डिसेंबर 2022 च्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते, जे न्यायमूर्ती आरएम जोशी यांनी रद्द केले आहे. न्यायमूर्ती जोशी म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकाने मुलांची देखभाल केल्याच्या केवळ अस्पष्ट आरोपांच्या आधारे मुलांच्या नावावर केलेले गिफ्ट डीड रद्द करता येणार नाही. 2016 मध्ये वृद्ध महिलेने कोल्हापुरात दोन फ्लॅट तिची मोठी मुलगी आणि जावयाला गिफ्ट डीडद्वारे दिले होते. नंतर महिलेने तिची मुलगी आणि जावयावर तिची काळजी घेण्याचे आश्वासन पूर्ण न केल्याचा आरोप केला. दोघांनी त्याला मूलभूत गरजा आणि सुविधांपासून वंचित ठेवले आहे. कारवाईच्या वेळी ती काही औषधांच्या प्रभावाखाली होती. फसवणूक करून हे करार आपल्याकडून मिळविल्याचे त्याने सांगितले. या आरोपांवर न्यायमूर्ती जोशी म्हणाले की, मुलीने आपली काळजी घेण्यात कशी निष्काळजीपणा केली हे महिला स्पष्टपणे सांगू शकत नाही.

# इमिग्रेशन ट्रॅकिंग सिस्टमद्वारे बांगलादेशी पकडले

मुंबई

रविवारी सकाळी बनावट पासपोर्टच्या मदतीने मुंबई विमानतळावरून दोहा (कतार) येथे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या प्रवाशाचे नाव मोहम्मद तौहीद अहमद (25) असल्याचे समोर आले आहे. या प्रवाशाने इमिग्रेशन काउंटरवर तपासणीसाठी व्हिसा दिल्याने हा प्रकार उघडकीस आला. कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्याने त्याचा पासपोर्ट आणि व्हिसा नोंदणी क्रमांक IVFRT (इमिग्रेशन व्हिसा आणि परदेशी नोंदणी ट्रॅकिंग) प्रणालीमध्ये टाकताच. त्याचा बांगलादेश व्हिसा अर्ज बाहेर आला आहे. ज्यावर बांगलादेशी पासपोर्ट क्रमांक लिहिलेला होता. या प्रवाशाचा जन्म 1999 साली बांगलादेशातील सिल्हेत येथे झाल्याचेही लिहिले होते. यानंतर प्रवाशाने स्वतः बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. प्रवाशाने सांगितले की तो २०१५ मध्ये बांगलादेशातून करीमगंज आसामला आला होता. 2017 मध्ये त्याने भारतीय पासपोर्ट मिळवला. तो भारतीय पासपोर्टही ट्रॅकिंग सिस्टीममध्ये टाकला असता, तो भारतातून बांगलादेशात गेल्याचे आढळून आले.

# अभिनेत्री ठरली गिफ्ट स्कॅमची बळी

मुंबई, दि. ११ प्रतिनिधी

मालाडमध्ये राहणारी 28 वर्षीय अभिनेत्री गिफ्ट स्कॅमची बळी ठरली. पीडितेने पोलिसांना सांगितले की, तिने सोशल मीडियावर अमनप्रीत सिंगची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली होती. अमनप्रीतने स्वत:ला ब्रिटनचे नागरिक असल्याचे सांगितेल. त्याने लग्नाचा प्रस्तावही ठेवला होता. संवादादरम्यान अमनप्रीतने त्याला 90 लाख रुपयांची भेट यूकेहून मुंबईला पार्सलमध्ये पाठवण्यास सांगितले. त्यासाठी नऊ लाख रुपये भरणे आवश्यक असल्याचे सांगितले. 8 ऑगस्ट रोजी अमनप्रीतने पार्सल पाठवल्याची माहिती दिली. 11 ऑगस्ट रोजी देखील त्याला एक फोन आला ज्यामध्ये त्याने आयकर विभागाचा अधिकारी असल्याचा दावा केला आणि त्याचे पार्सल जप्त करण्याची आणि गुन्हा नोंदवण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केली. अभिनेत्रीने सांगितले की तिने कॉलर आणि अमनप्रीतवर विश्वास ठेवला आणि तिच्या तीन बँक खात्यांमधून पैसे त्यांच्या खात्यात ट्रान्सफर केले. त्यानंतरही त्याची मागणी सुरूच राहिली आणि तिने वहिनीकडून पैसे घेऊन त्याला पाठवले. त्यानंतरही अमनप्रीतचा सतत फोन येत असताना तिला संशय आला आणि तिने वर्सोवा पोलिसांशी संपर्क साधला. वर्सोवा पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही 16 बँक खात्यांचे तपशील शोधण्यास आणि गोठवण्यास सांगितले आहे ज्यात आरोपीने पीडितेला पैसे ट्रान्सफर करण्यास सांगितले होते.

# माजी प्रियकराकडून 10 लाख रुपये वसूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

मुंबई, दि. ११ प्रतिनिधी

वांद्रे पोलिसांनी एका महिलेविरुद्ध एका पुरुषाकडून 10 लाख रुपये उकळल्याप्रकरणी आणि बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. २० वर्षीय आरोपी महिलेचे प्रेमसंबंध होते. मात्र, आरोपी महिलेच्या वडिलांनी या नात्याला विरोध केल्याने हे नाते तुटले. पण, लग्नानंतर महिलेने तिच्या माजी प्रियकराकडे व्यवसायासाठी 10 लाख रुपयांची मागणी केली. ते न दिल्याने तिने त्याला तिला बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली.

# दुचाकीला बसची धडक; एकाचा मृत्यू

मुंबई

आरे कॉलनी येथे बेस्ट बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत ४६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. मृत व्यक्ती पाव वितरक होता. याप्रकरणी आरे सब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास हा अपघात झाला. दुचाकीस्वार सादिक खान हा उत्तर मुंबईतील विविध ठिकाणी पावाचे वितरण करायचा. मंगळवारी नेहमीप्रमाणे तो दुचाकीवरून आरे कॉलनीत जात असताना बेस्टने त्याच्या दुचाकीला धडक दिली. बस क्रमांक ४५२ गोरेगाव स्थानकाहून मयूर नगरकडे जात असताना हा अपघात झाला. ती बस चालक रमेश लोंढे चालवत होता. मालाड पूर्व येथील दिंडोशी येथील रहिवासी असलेल्या खानला बसने दिलेल्या धडकेनंतर तो रस्त्यावर पडला. त्याच्या डोके बसच्या मागील चाकाखाली चिरडले गेले. परिसरातील नागरिकांनी खानला तात्काळ रुग्णालयात नेले, परंतु रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी प्रत्यक्षदर्शी आणि चालकाचा जबाब नोंदवला.

# मुंबई कस्टम झोन-I आणि महसूल गुप्तचर संचालनालयातर्फे 177 कोटींचे अंमली पदार्थ नष्ट

मुंबई

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ (CBIC), मुंबई कस्टम्स झोन-I आणि महसूल गुप्तचर संचालनालय (DRI) च्या ड्रग डिस्ट्रक्शन कमिटीने 24.73 किलो नार्कोटिक ड्रग्ज आणि सायकोट्रॉपिक सबस्टन्स (NDPS) जाळून नष्ट केले आहेत. नवी मुंबई येथील तळोजा येथे मुंबई कचरा व्यवस्थापन लिमिटेडच्या सामायिक घातक कचरा प्रक्रिया साठवण आणि विल्हेवाट सुविधा (CHWTSDF) केंद्र येथे हेरॉईन, कोकेन आणि गांजा या अंमली पदार्थांसह, 177 कोटी रुपये इतके अंदाजे बेकायदेशीर बाजार मूल्य असलेले पदार्थ नष्ट करण्यात आले. चालू आर्थिक वर्षातील अंमली पदार्थ नष्ट करण्याची ही अशा प्रकारची पहिलीच कारवाई आहे. गेल्या आर्थिक वर्षात मुंबई कस्टम झोन-1 ने 1,525 कोटी रुपये किंमतीचे 215.27 किलो ड्रग्ज नष्ट केले होते. पोस्टल मूल्यांकन विभाग (PAS) आणि मुंबई कस्टम झोन-I च्या विशेष तपास आणि गुप्तचर शाखा (SIIB) यांनी महसूल गुप्तचर संचालनालयाच्या सहकार्याने हे अंमली पदार्थ जप्त केले.



# बुलेट ट्रेनच्या मार्गावर 1,75,000 ध्वनी अवरोधक

मुंबई

ट्रॅकजवळ राहणाऱ्या लोकांना ध्वनी प्रदूषणाचा सामना करावा लागणार नाही आणि देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या मार्गाजवळ राहणाऱ्या लोकांना ध्वनी प्रदूषणाच्या समस्येचा सामना करावा लागणार नाही. रेल्वेमुळे स्थानिक नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी रेल्वे मार्गावर नॉईज बॅरिअर्स बसविण्याचे काम करत आहे. आतापर्यंत ८७.५ किमी मार्गावर ध्वनी अवरोधक बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. मार्गावर 1,75,000 हून अधिक ध्वनी अवरोधक बसवण्यात आले आहेत. व्हायाडक्टच्या दोन्ही बाजूला एक किमी अंतरावर 2000 ध्वनी अवरोधक बसविण्यात आले आहेत. ध्वनी अडथळयांमध्ये 2 मीटर उंच आणि 1 मीटर रुंद काँक्रीट पॅनेल असतात. प्रत्येक आवाज अडथळा अंदाजे 830-840 किलो वजनाचा असतो. मुंबई ते अहमदाबाद दरम्यान बुलेट ट्रेन धावण्यासाठी मार्ग तयार करण्यात येत आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची व्यवस्थापन समिती

## माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची माहिती

मुंबई

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रदेश भाजपच्या वतीने व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि या समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी मंगळवारी येथे दिली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती निवडणूक अभियान समन्वयक म्हणून ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची नेमणूक करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजपने आगामी विधानसभा निवडणुकीत १२५ जागा निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. त्यादृष्टीने पक्षाची बूथपर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे व्यवस्थापन समिती तयार करण्यात आली आहे. या समितीमध्ये तीन सहसंयोजक, विविध स्तरांवरच्या समित्यांचे प्रमुख तसेच विशेष आमंत्रित आणि पदसिद्ध सदस्यांचा समावेश आहे, अशी माहिती दानवे यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

विधानसभा निवडणुकीचे नियोजन, संचलन करण्यासाठी प्रदेश, जिल्हा, तालुका स्तरावर अधिवेशने झाली आहेत. विधानसभा निवडणूक व्यवस्थापन समिती अंतर्गत विविध स्तरांवर समित्या गठित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे, अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते, आमदार श्रीकांत भारतीय यांची सहसंयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे दानवे यांनी सांगितले.

याशिवाय पक्षाने विविध समित्यांचे प्रमुख नेमले आहेत. त्यानुसार जाहीरनामा समिती प्रमुख म्हणून वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, विशेष संपर्क प्रमुख म्हणून उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामाजिक संपर्क प्रमुख म्हणून राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, महिला संपर्क प्रमुख म्हणून राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर, कृषी क्षेत्र संपर्क प्रमुख म्हणून अशोक चव्हाण, लाभार्थी संपर्क प्रमुख म्हणून महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, युवा संपर्क प्रमुख म्हणून केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, प्रचार यंत्रणा प्रमुख म्हणून सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, सहकार क्षेत्र संपर्क प्रमुख म्हणून विधान परिषद गटनेते प्रवीण दरेकर, माध्यम प्रमुख म्हणून आमदार अतुल भातखळकर, ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्था संपर्क प्रमुख म्हणून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, अनुसूचित जाती संपर्क प्रमुख म्हणून माजी आमदार भाई गिरकर, अनुसूचित जमाती संपर्क प्रमुख म्हणून आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, सोशल मीडिया प्रमुख म्हणून आमदार निरंजन डावखरे, निवडणूक आयोग संपर्क प्रमुख म्हणून माजी खासदार किरीट सोमय्या यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती दानवे यांनी दिली.

दरम्यान, व्यवस्थापन समितीवर विशेष आमंत्रित म्हणून केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, भाजप मुंबई अध्यक्ष आशीष शेलार, खासदार नारायण राणे, माजी मंत्री गणेश नाईक, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहिर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे दानवे यांनी यावेळी सांगितले.

# ऑलेक्ट्राने वसई-विरार महापालिकेला एका महिन्यात दिल्या 40 इलेक्ट्रिक बस

मुंबई

ऑलेक्ट्राने 40 बसेसचा संपूर्ण ताफा वसई विरार महापालिकेच्या परिवहन विभागाकडे सुपूर्द केला आहे. 24 जानेवारी 2014 रोजी, ऑलेक्ट्राने 40 इलेक्ट्रिक बसेसच्या पुरवठ्यासाठी महानगरपालिकेसोबत करार केला. प्रोटोटाइप बसला 23 ऑगस्ट रोजी VVCMC ने अंतिम मंजुरी दिली होती. त्यानंतर ऑलेक्ट्राने महिनाभरात बसेसची डिलिव्हरी पूर्ण केली. या बसेसमध्ये प्रगत ड्रायव्हर सहाय्यता प्रणाली, एअर सस्पेंशन, इलेक्ट्रॉनिक स्थिरता नियंत्रण, डिस्क ब्रेक आणि उत्कृष्ट गतिशीलता यांसारखी वैशिष्ट्ये आहेत. बस केवळ 90 मिनिटांच्या जलद चार्जिंग प्रणालीसह 200 किमी अंतर कापू शकते. 31 प्रवासी आणि चालक यांच्या आसनक्षमतेसह, या बसेस शहरी वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत.



ऑलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. के.व्ही. प्रदीप म्हणाले की, प्रदूषणाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे. या बसेसच्या आगमनाने वसई विरार शहरात सध्या वर्षाला ९३ लाख लिटर डिझेलची बचत होणार आहे. या बसेसमुळे 25,000 टन कार्बन उत्सर्जन कमी होईल, जे 1.5 लाख झाडे लावण्याइतके आहे. ऑलेक्ट्राने बेस्ट आणि महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या बसेसच्या वितरणाचा वेग वाढवला आहे. आतापर्यंत, ऑलेक्ट्राने अनुक्रमे 252 आणि 138 बसेस दिल्या आहेत.

# वैज्ञानिकों की चेतावनी खराब हवा में सांस लेने वाली मां के बच्चे हो सकते हैं बौने, ये हैं बचाव के उपाय

गर्भवती महिलाएं अगर रासायनिक उद्योगों की वजह से होने वाले वायु प्रदूषण के संपर्क में आती हैं, तो इसका असर उसके पेट में पल रहे बच्चे पर भी पड़ता है। इसके दुष्परिणामों के कारण जन्म के समय शिशु का वजन और कद कम हो सकता है। अमेरिका की नेशनल लाइब्रेरी ऑफ मेडिसिन के डाटाबेस पबमेड और मेडिकल संबंधी स्वतंत्र डाटाबेस स्कोपस पर प्रकाशित 45 लेखों, शोधों और अध्ययनों की समीक्षा में यह निष्कर्ष सामने आए हैं। शोधकर्ताओं ने बताया कि गर्भावस्था के दौरान प्रदूषण के इन सूक्ष्म कणों के संपर्क में आने से जन्म के समय शिशु का वजन सामान्य से कम हो सकता है। साथ ही उन्हें अस्थमा, ऑटिज्म भी हो सकता है। शोधकर्ताओं ने वायु प्रदूषक पीएम 2.5 और नीदरलैंड में पैदा हुए करीब चार हजार सिंगलटन शिशुओं के जन्म के वजन के बीच संबंध को देखा।

ये हो सकते हैं नुकसान-

गर्भपात-

वायु प्रदूषण से गर्भपात का खतरा बढ़ सकता है। ऐसा गर्भनाल में सूजन बढ़ने की



वजह से होता है, जिससे भ्रूण के विकास में दिक्कतें आती हैं।

थायराइड-

प्रदूषण गर्भवती महिला के थायराइड को प्रभावित करता है। भ्रूण के विकास और मेटाबोलिज्म को नियमित करने के लिए यह बहुत जरूरी होता है।

अस्थमा-

गर्भवती महिलाओं को वायु प्रदूषण की वजह से अस्थमा हो सकता है। अगर इसका इलाज न किया जाए तो इसकी वजह से शिशु को भी अस्थमा हो सकता है।

ये प्रदूषक है जिम्मेदार-

1. पीएम2.5, पीएएचएस, बेंजीन और कैडमियम जैसे औद्योगिक वायु प्रदूषकों से बच्चे समय से पहले ही पैदा हो सकते हैं।

